रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २०८
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार, १४ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## २०४७पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य : पीएम मोदी



**अबुधाबी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसीय यूएईच्या अबुधाबीच्या दौर्‍यावर असून त्यांनी या दौर्‍यादरम्यान 'अहलान मोदी' कार्यक्रमाला हजेरी लावत यूएईमधील भारतीय वंशांच्या नागरिकांना संबोधित केले. या वेळी पंतप्रधान मोदींना एका हिंदू मंदिराला जमीन दिल्याबद्दल यूएईचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन जायद अल नाहयान यांचे आभार मानले तसेच भारताला २०४७ सालापर्यंत विकसित करण्याचे लक्ष्य असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, गेल्या १० वर्षांत यूएईमध्ये माझा हा सातवा दौरा आहे. भाई शेख मोहम्मद बिन जायद आजदेखील विमानतळावर घेण्यासाठी आले होते. मला आनंद वाटतोय आम्हालाही चार वेळा स्वागत करण्याची संधी मिळाली आहे. भारताची अर्थव्यवस्था वेगाने पुढे जात असून २०४७पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याचे लक्ष्य आहे.

अंतरंग
एसटी महामंडळाच्या ताफ्यात ५,१५० इलेक्ट्रिक बस/२
रोह्यात विद्यार्थ्यांना दुर्बिणीद्वारे आकाश निरीक्षणाची पर्वणी/५
नेरे संघ ठरला सरपंच चषकाचा मानकरी/८

# काँग्रेस नेते अशोक चव्हाण भाजपमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सोमवारी पक्ष सदस्यत्व व आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर मंगळवारी (दि.१३) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजपच्या मुंबईतील प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमास मंत्री गिरीश महाजन, भाजप मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, खासदार प्रतापराव चिखलीकर, ज्येष्ठ नेते हर्षवर्धन पाटील, आमदार प्रवीण दरेकर, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. माजी मुख्यमंत्री चव्हाण यांच्याबरोबर माजी आमदार अमर राजूरकर यांनीही काँग्रेसला रामराम करीत विकासाचे 'कमळ' हाती घेतले. या वेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी चव्हाण व राजूरकर यांना पक्षाचे सदस्यत्व दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर व विकासकार्यावर विश्वास असल्याने अन्य पक्षांतील प्रमुख नेत्यांचा भाजपकडे ओढा वाढला आहे. देशाच्या विकासासाठी पंतप्रधान मोदी करीत असलेल्या प्रामाणिक प्रयत्नांमध्ये योगदान द्यावे या भावनेने अशोक चव्हाण यांच्यासारखा नेता भाजपशी जोडला गेला आहे. त्यांनी कुठल्याही पदाची अपेक्षा न ठेवता देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात काम करण्यासाठी बिनशर्त प्रवेश केल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी सांगितले. नजिकच्या काळात अन्य पक्षांतील अनेक नेते व कार्यकर्त्यांचाही भाजपमध्ये प्रवेश होणार असल्याचे ते म्हणाले.

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी, या पुढील काळात सबका साथ, सबका विकास यानुसार देशाच्या विकासकार्यात सकारात्मक भावनेने व विकासाभिमुख दृष्टिकोन ठेवून भाजपचे कार्य करेन, अशी भावना व्यक्त केली.



### 'भाजपसह महायुतीची ताकद वाढली'

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अशोक चव्हाण यांच्यासारख्या ताकदीच्या नेत्याचा भाजप प्रवेशाचा दिवस हा सर्वांसाठी आनंदाचा क्षण आहे. अशोक चव्हाण यांनी दोन वेळा राज्याचे नेतृत्व केले तसेच त्यांनी राज्यातील मंत्रिमंडळात कॅबिनेट व राज्यमंत्रिपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यांच्या प्रवेशाने भाजप व महायुतीची ताकद वाढली आहे.

> *आजपासून मी नव्या राजकीय आयुष्याचा प्रारंभ करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पपूर्तीमध्ये योगदान देण्यासाठी भाजपत प्रवेश करीत आहे. मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशाच्या होत असलेल्या प्रगतीने प्रभावित होऊन भाजपची राज्यात ताकद वाढवण्यासाठी आणि आगामी निवडणुकांमध्ये राज्यात भाजपला अधिकाधिक जागा मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन.*
> **-अशोक चव्हाण, माजी मुख्यमंत्री**

## पनवेल महापालिकेच्या विविध विकासकामांचे आज भूमिपूजन

**मान्यवरांची लाभणार उपस्थिती**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ बुधवारी (दि.१४) सायंकाळी ५ वाजता राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते कळंबोली येथे होणार असून या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण असणार आहेत.

कळंबोली सेक्टर ११मधील प्लॉट क्रमांक ६/१ येथे होणार्‍या या समारंभास राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांची प्रमुख उपस्थिती असणार असून खासदार श्रीरंग बारणे, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, निरंजन डावखरे, अनिकेत तटकरे, गोपीचंद पडळकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या समारंभात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह बांधकाम, खारघर नोडमधील विविध रस्त्यांचे काँक्रीटीकरण व पुनर्पृष्ठीकरण, कळंबोली नोडमधील विविध रस्त्यांचे काँक्रीटीकरण व पुनर्पृष्ठीकरण, महापालिका मुख्यालयालगतच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण व उन्नतीकरण, पनवेल शहरातील स्वामी नारायण मार्गाचे काँक्रीटीकरण तसेच अमृत योजनेंतर्गत मलनिस्सारण वाहिन्या व मल प्रक्रिया केंद्र उभारणे आणि पाणीपुरवठा वितरण व्यवस्था उभारणे या विकासकामांचे भूमिपूजन होणार आहे, अशी माहिती पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी दिली.

## कामगारांवर अन्याय करणार्‍या अमेटी विद्यापीठावर कडक कारवाई करा

**उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे कामगार विभागाला आदेश**



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भाताण येथील अमेटी विद्यापीठातील कामगारांवर होणार्‍या अन्यायाची उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गांभिर्याने दखल घेत विद्यापीठावर कडक कारवाई करण्याचे आदेश कामगार विभागाला दिले असून विद्यापीठास कामगारांना योग्य न्याय देण्याचेही आदेश दिले आहेत.

भाताण येथील अमेटी विद्यापीठातील कामगारांवर होणार्‍या अन्याविरोधात आमदार महेश बालदी यांनी मंत्रालयात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या दालनात भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि.१३) दुसरी बैठक आयोजित केली होती.

दोन महिन्यांपूर्वी झालेल्या बैठकीमध्ये मंत्रीमहोदयांनी कामगार आयुक्तांना विद्यापीठाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. या विभागाने केलेल्या चौकशीमध्ये अमेटी विद्यापीठ कामगारांवर अन्याय करीत असल्याचे समोर आले आहे. **(पान २ वर..)**

## गणपती बाप्पा मोरया! रायगडात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि.१३) माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्ह्यातील गणपती मंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. गणेश जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अलिबागच्या कुलाबा किल्ल्यातील ऐतिहासिक आंग्रेकालीन गणपती मंदिरात माघी गणेशोत्सव भक्तीमय वातावरणात साजरा झाला.



गणेशभक्तांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी लांबलचक रांगा लावल्या होत्या. भाविकांनी भरती येण्यापूर्वीच सकाळी लवकर दर्शन घेणे पसंत केले. संध्याकाळी पुन्हा ओहोटीच्या वेळी मंदिरात गर्दी झाली होती. रात्री उशिरापर्यंत दर्शन सोहळा सुरू होता.

अष्टविनायकांपैकी पालीचा बल्लाळेश्वर व महडचा सिद्धीविनायक ही दोन स्थळे रायगड जिल्ह्यात आहेत. तेथील गणेश मंदिरे भाविकांनी फुलून गेली होती. मुरूड तालुक्यातील नांदगाव येथील सिद्धीविनायक, चिरनेरचा महागणपती, कडावचा बालदिगंबर, श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगरचा सुवर्णगणेश, जांभुळपाडा येथील सिद्धीगणेश, मुगवलीचा स्वयंभू गणेश अशा प्रमुख मंदिरांमध्येही भविकांची दर्शनासाठी गर्दी दिसून आली.

पनवेल महानगरपालिका
स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका



**विविध विकास कामांचा भूमीपूजन समारंभ**

सस्नेह निमंत्रण

शुभहस्ते
**मा. ना. श्री. उदय रविंद्र सामंत**
मंत्री, उद्योग, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री रायगड जिल्हा

कार्यक्रमाचे अध्यक्ष
**मा. ना. श्री. रविंद्र चव्हाण**
सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून), महाराष्ट्र राज्य

प्रमुख उपस्थिती
**मा. ना. कु. आदिती वरदा सुनिल तटकरे**
मंत्री, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य

विशेष उपस्थिती
**मा. खा. श्री. श्रीरंग बारणे** - लोकसभा सदस्य
**मा. आ. श्री. निरंजन डावखरे** - विधान परिषद सदस्य
**मा. आ. श्री. अनिकेत तटकरे** - विधान परिषद सदस्य
**मा. आ. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे** - विधान परिषद सदस्य
**मा. आ. श्री. गोपीचंद पडळकर** - विधान परिषद सदस्य
**मा. आ. श्री. प्रशांत ठाकूर** - विधानसभा सदस्य
**मा. डॉ. महेंद्र कल्याणकर** भा.प्र. से. - विभागीय आयुक्त, कोकण
**मा. डॉ. योगेश म्हसे** भा. प्र. से. - जिल्हाधिकारी, रायगड

विनीत
**गणेश देशमुख**
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

भूमीपूजन समारंभ
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह बांधकाम.**
**खारघर नोडमधील विविध रस्त्यांचे काँक्रीटीकरण व पुनर्पृष्ठीकरण.**
**कळंबोली नोडमधील विविध रस्त्यांचे काँक्रीटीकरण व पुनर्पृष्ठीकरण.**
**महानगरपालिका मुख्यालय लगतच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण व उन्नतीकरण.**
**पनवेल शहरातील स्वामी नारायण मार्गाचे काँक्रीटीकरण.**
**अमृत योजने अंतर्गत, मलनिस्सारण वाहिन्या व मल प्रक्रिया केंद्र उभारणे आणि पाणीपुरवठा वितरण व्यवस्था उभारणे.**

बुधवार दिनांक : १४ फेब्रुवारी २०२४
वेळ : सायंकाळी ५.०० वाजता
ठिकाण : प्लॉट नं ६/१, सेक्टर-११, कळंबोली, पनवेल

# शिळफाटा जंक्शन उड्डाणपुलाच्या पनवेलकडील मार्गिकेचे लोकार्पण

## वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास होणार मदत

**नवी मुंबई : बातमीदार**

शिळफाटा जंक्शनवर उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या पनवेलकडे जाणाऱ्या मार्गिकेचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. पनवेलकडे जाणाऱ्या या उड्डाणपुलाच्या या भागात तीन मार्गिका असून मुंब्रा दिशेला जाणारी बाजू पुढील दोन महिन्यात खुली करण्यात येईल.

मुंबई आणि आसपासच्या भागातील वाहतूक कोंडी कमी व्हावी हे एमएमआरडीएचे उद्दीष्ट असून या पुलामुळे ठाणे आणि जेएनपीटी दरम्यानची वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होईल.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, एमएमआरडीएने वेळोवेळी महत्त्वाकांक्षी आणि नावीन्यपूर्ण प्रकल्प हाती घेतले आहेत. पायाभूत सुविधांचा विकास करीत असताना शाश्वततेची कास एमएमआरडीएने धरली आहे. पायाभूत सुविधांचा शाश्वत विकास करण्यात एमएमआरडीएने मोठी आणि यशस्वी झेप घेतली आहे. एमएमआरडीएला सातत्याने पाठबळ देणे हे यामुळेच या क्षणाचा साक्षीदार होत असताना मला फार आनंद होत आहे. हा उड्डाणपूल एमएमआर क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या पुलाचे लोकार्पण करीत असताना मला फार आनंद झाला आहे. मुंबई महानगर क्षेत्राचा शाश्वत विकास व्हावा यासाठी एमएमआरडीए सातत्याने प्रयत्न करीत असून या प्रयत्नांना आम्ही सातत्याने पाठबळ देत आलो आहोत याचे मला समाधान आहे, असे सांगितले.

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त भाप्रसे डॉ. संजय मुखर्जी यांनी, मुंबई महानगर क्षेत्र आणि त्याच्या आसपासच्या भागात एमएमआरडीए विविध विकास कामे करीत आहे. या सगळ्या विकास कामांचे उद्दीष्ट हे एकच आहे ते म्हणजे संपूर्ण एमएमआर क्षेत्राचा शाश्वत विकास करणे. त्यामुळे मार्गांची उभारणी करत असताना ती शाश्वत पद्धतीने व्हावी हा आमचा प्रयत्न असतो. राष्ट्रीय महामार्ग ४८वर उभारण्यात आलेला शिळफाटा उड्डाणपूल हाच दृष्टीकोन ठेवून उभारण्यात आला आहे. या पुलामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल आणि सोबतच इंधनाचीही बचत होईल, असे सांगितले.

# विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

लातूर बाजार समितीचे माजी सभापती नानासाहेब देशमुख, नाशिक येथील स्वामी श्रीकंठानंद, पुसद नगरपालिकेचे माजी सभापती अजय पुरोहित आदींसह लातूर, यवतमाळ, नाशिक, सोलापूर या जिल्ह्यातील विविध पक्ष आणि सामाजिक संघटनांच्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि. १३) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी त्यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमाला खासदार सुधाकर श्रृंगारे, आमदार अभिमन्यू पवार, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश सचिव नवनाथ पडळकर, पदवीधर प्रकोष्ठ प्रदेश संयोजक धनराज विसपुते आदी उपस्थित होते.



भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्यांमध्ये उमरखेड नगरपालिकेचे माजी सभापती ॲड. शैलेश मुंगे, यवतमाळ जिल्ह्यातील सरपंच संघटनेचे अध्यक्ष अमोल चिकणे, सोनार सेवा महासंघाचे प्रदेश अध्यक्ष लक्ष्मीकांत लोळगे, मनोहर खरवडे, अखिल भारतीय माळी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष राजेंद्र महाडोळे, अमोल गुर्नुले, सोलापूर येथील लिंगायत महिला मंडळाच्या अध्यक्ष रंजना चकोटे, अ. भा.वाल्मिकी नवयुवक संघाच्या युवक आघाडीचे अध्यक्ष आणि उल्हासनगरचे माजी नगरसेवक मोहन कंडारे, संभाजी ब्रिगेड नाशिक जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे, पंकज शेलार, सेवानिवृत्त गटविकास अधिकारी मधुकर मुरकुटे आदींचा समावेश आहे.

नाशिक जिल्ह्यातील स्वामी श्रीकंठानंद हे रामकृष्ण आरोग्य संस्थानचे अध्यक्ष असून या संस्थेतर्फे नाशिक जिल्ह्यात आरोग्य आणि आध्यात्मिक क्षेत्रात उपक्रम राबवले जातात.

# जंतनाशक मोहिमेंतर्गत पाच लाख बालकांना गोळ्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील एक वर्ष ते १९ वर्षे वयोगटातील पाच लाख १५ हजार मुलामुलींना मंगळवारी (दि.१३) जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. जिल्ह्यात या मोहिमेचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत शहरातील नमिता नाईक इंग्लिश मिडीयम स्कूल येथे करण्यात आला.



जंतनाशक मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन केले होते. ग्रामीण भागात ५४ प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच २८० आरोग्य उपकेंद्रे या ठिकाणी कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका यांनी सहभाग नोंदविला, तर शहरी भागामध्ये जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय यांच्यामार्फतही मोहीम राबविण्यात येणार आहे. १ ते १९ वर्ष वर्ष वयोगटातील मुलांना अंगणवाड्या, शाळा, कनिष्ठ महाविद्यालये येथे जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. ज्या मुलांना मंगळवारी जंतनाशक गोळी मिळाली नाही, त्यांना गोळी देण्यासाठी २० फेब्रुवारी रोजी मॉप–अप राऊंडच्या वेळी गोळी देण्यात येणार आहे.

जंतनाशक मोहीम शुभारंभ कार्यक्रमास जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे, बालसंगोपन अधिकारी डॉ. प्रताप शिंदे उपस्थित होते.

**बालके ही देशाचे भविष्य आहेत. ते निरोगी असणे गरजेचे आहे. जंत दोषामुळे बालकांमध्ये ॲनिमियाचा सर्वाधिक धोका उद्‌भवतो. शिवाय आतड्यांना सूज येणे, पोटदुखी, भूक मंदावणे, उलट्या, अतिसार तसेच इतर आजार उद्‌भवतात. या आजारांना आळा घालण्यासाठी वर्षातून दोन वेळा बालकांनी जंतनाशक गोळी घेणे गरजेचे आहे. वैयक्तिक स्वच्छता रखण्यासोबत तसेच परिसर स्वच्छ ठेवावा.**
**–डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप**

# पनवेलमध्ये दोन ठिकाणी घरफोडी; मोठा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील शिरढोण व खारघर या दोन वेगवेगळ्या ठिकाणी दुकानात झालेल्या घरफोडीत मोठ्या प्रमाणात ऐवज लंपास झाल्याची घटना घडली आहे.

गुन्हे

शिरढोण येथील मयुर हार्डवेअर ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स या ठिकाणी दुकानाच्या मागील बाजूस असलेल्या खिडकीचे लोखंडी गज कोणीतरी अज्ञाताने उचकटून त्याद्वारे आत प्रवेश करून दुकानात असलेल्या विविध कंपन्यांच्या कॉपर वायर व इतर बाथरुम फिटींगचे सामान असा मिळून जवळपास ७५ हजार ७२५ रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत खारघर सेक्टर १३मधील गणेश सोसायटीत रतन भवर सिंग यांचे मोबाईल दुकान आहे. दुकान बंद करून ते घरी गेले असता, चोरट्यांनी रात्री दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला, तसेच आतील स्मार्ट वॉच, ब्लूटूथसह इतर साहित्य आणि १५ हजार रोख असा एकूण ३२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. दुकानात असलेल्या सीसीटीव्हीत चोर चोरी करीत असल्याचे निदर्शनास येत असून खारघर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ५,१५० इलेक्ट्रिक बस दाखल

**ठाणे : प्रतिनिधी**

खासगी बससेवेशी स्पर्धा करताना प्रवासी हाच आपला परमेश्वर असे मानून प्रवाशांना उत्तम दर्जाची सेवा द्यावी, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि.१३) येथे केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात पाच हजार १५० इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या. या बसेसच्या लोकार्पण सोहळा येथील खोपट बसस्थानक या ठिकाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या समारंभास आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सचिव पराग जैन, व्यवस्थापकीय संचालक माधव पुसेकर, गोपाळ लांडगे, मीनाक्षी शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत श्रेया लाल प्रथम



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतर्फे भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय येथे राज्यस्तरीय उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. केएलई कॉलेज ऑफ लॉमधील श्रेया लाल हिने ट्रॉफी आणि १०,००० रुपयांचे रोख पारितोषिक मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.

या वेळी प्रमुख पाहुणे विधी व्यावसायिक सुभाष महाडिक उपस्थित होते. प्राथमिक फेरीचे परीक्षक ॲड. स्वप्नील पाटील, डॉ. अमिताभ गवळे, रवनिश बेक्टर आणि डॉ. ममता गोस्वामी हे होते. अंतिम फेरीत, सहभागींनी उत्स्फूर्त वक्तृत्व कौशल्याचे प्रदर्शन केले. परीक्षक सरकारी अधिवक्ता अश्विनी टाकळकर आणि अंतर्गत परीक्षक सहायक प्रा. धनश्री कदम यांनी विजेत्यांची निवड केली.

तृतीय वर्ष एल. एल. बी. ची विद्यार्थिनी योगिता भगत यांचे जनार्दन भगतसाहेबांचा इतिहास आणि काही प्रसंग यावर केलेले अभ्यासपूर्ण भाषण हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. स्पर्धेत केएलई कॉलेज ऑफ लॉमधील श्रेया लाल प्रथम, एग्नेल स्कूल ऑफ लॉच्या प्रियांशी विजय पाटील आणि जिज्ञासा भगत या दोघींनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना ट्रॉफी आणि ७,००० आणि ५,००० रुपयांचे रोख पारितोषिक मिळाले. सर्व सहभागी स्पर्धकांना त्यांच्या मेहनतीची दखल घेऊन सहभाग प्रमाणपत्रांचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली. शेवटी अपराजिता गुप्ता यांनी आभार मानले.

# उरण येथे राज्यस्तरीय काव्य स्पर्धा व पुरस्कार वितरण

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

तालुक्यातील एस.एस. पाटील इंटरनॅशनल स्कूल, फुंडे येथे १७ व १८ फेब्रुवारी रोजी १००वे कवी संमेलन, भव्य बक्षिसांच्या, काव्यस्पर्धेच्या रूपात होणार आहे.

राज्यातून निवडलेल्या २० कवींना जवळजवळ एक लाखांची बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात येणार आहेत. ही स्पर्धा एकूण चार गटात होणार असून राज्यस्तरीय खुल्या गटासाठी प्रथम क्रमांकांचे बक्षीस २५ हजार रुपयांचे आहे. संमेलनाचे अध्यक्ष प्रा.एल.बी.पाटील असून कोमसापचे संस्थापक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी या संमेलनाला शुभाशिर्वाद दिले आहेत. संमेलनात प्राचार्य शामा सर, प्राचार्य प्रल्हाद पवार, प्राचार्य एल. एम. भोये, चित्रकार प्रकाश पाटील, मिसेस महाराष्ट्र श्वेता राजकुमार, जलतरणपटू मयंक म्हात्रे, फिल्म मेकर तेजस पाटील, हभप भालचंद्र म्हात्रे महाराज यांना गौरविण्यात येणार आहे.

# बीसीटी विधी महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयच्या माजी विद्यार्थी समितीने शनिवारी (दि.१०) वार्षिक माजी विद्यार्थी मेळावा आयोजित केला होता.

प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक प्रा. अनम मेहांदिकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने झाली. संस्थापक स्व. जनार्दन भगत, स्व. चांगू काना ठाकूर आणि स्व. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

प्रा. मेहंदीकर यांनी महाविद्यालयाची प्रगती आणि माजी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे प्रदर्शन करणारे व्हिडीओ सादर केले. माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य ॲड. जय पावणेकर, ॲड. रवी कसबे व ॲड. दीपाली बोहोरा यांनी माजी विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्यातील मजबूत संबंध वाढवण्यासाठी सतत सहकार्य केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

अनुजा राणे हिला पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कलागुणांचे सादरीकरण केले. आनंद आणि सौहार्द वाढवणारे विविध कार्यक्रम राबविण्यात आले.



# उरणच्या इतिहासाला राष्ट्रीय अधिवेशनात मिळाला उजाळा

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

कोकण इतिहास परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन कणकवली येथे आयोजित करण्यात आले होते. या परिषदेत विविध विषयांवरील शोधनिबंधांचे सादरीकरण करण्यात आले.

या अधिवेशनात उरण तालुक्याच्या इतिहासाला उजाळा देणारे दोन शोधनिबंध सादर झाले. इतिहास संशोधक डॉ. अंजय धनावडे (महाड) व तुषार म्हात्रे (पिरकोन, उरण) यांच्या उरण येथील शिलाहारकालीन नौकायुद्ध या शोधनिबंधाची निवड या परिषदेस झाली होती. पुनाडे येथील अनोख्या वीरगळाची अभ्यासपूर्ण मांडणी या शोधनिबंधात करण्यात आली होती. उरणच्या इतिहासात भर घालणारा या शोधनिबंधाचा समावेश परिषदेत प्रकाशित झालेल्या 'कनक' या पुस्तकात करण्यात आला आहे.




यासह युवा संशोधक अभिषेक ठाकूर (दिघोडे, उरण) यांच्या उरण तालुक्यातील भूसंपादनविरोधी लढा : शेतकऱ्यांचा सहभाग या शोधनिबंधाचे वाचन झाले. शोधनिबंधाचा समावेश कोकण इतिहास परिषदेच्या ई–बुक मध्ये करण्यात आला आहे.

तालुक्याच्या इतिहासावरील शोधनिबंधाच्या उच्च स्तरावरील सादरीकरणामुळे येथील संशोधनवृत्तीस चालना मिळून स्थानिकांच्या इतिहास विषयक दृष्टीकोनात सकारात्मक बदल होतील, असा विश्वास या संशोधकांनी व्यक्त केला आहे.

पान १ वरुन

## कामगारांवर अन्याय करणाऱ्या अमेटी विद्यापीठावर कडक कारवाई करा

मंत्रीमहोदयांनी या विद्यापीठावर कडक कारवाईचे आदेश कामगार विभागाला दिले असून विद्यापीठास कामगारांना योग्य न्याय देण्याचेही आदेश दिले आहेत.

या बैठकीस भाजपचे गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, भाताणचे सरपंच तानाजी पाटील, उपसरपंच अरुण पाटील, ग्रामपंचायत सदस्य दीपक ठाकूर, अनिल काठावले, युवा कार्यकर्ते अनिल भोईर, स्वप्नील भोईर, किरण मुकादम, कामगार प्रतिनिधी तकदीर सते, रमेश भोईर, संदीप म्हस्कर, नितेश पाटील, प्रकाश भोईर आदी उपस्थित होते.

## खाद्यपदार्थांची उघड्यावर विक्री केल्याने कारवाई

**पनवेल :** विनापरवाना उघड्यावर खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांविरुद्ध तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे.

तालुक्यातील आसावरी गृहसंकुल येथे उघड्यावर पुरी–भाजी बनविणारे, देवीचापाडा येथे समोसा बनविणारे व पडघे गाव येथे वडापाव बनविणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुखवटा

### दाऊद चोरडेकर



**धाटाव :** रोहा येथील ज्येष्ठ पत्रकार आणि नगर पालिकेचे माजी नगरसेवक अल्ताफ चोरडेकर यांचे वडील दाऊद इस्माईल चोरडेकर (वय ८२) यांचे शनिवारी (दि. १०) निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, जावई, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. रविवारी सकाळी निघालेल्या अंत्ययात्रेत विविध स्तरातील मान्यवरांसह मुस्लिम बांधव उपस्थित होते. मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली.

### धनाजी मुंबईकर



**उरण :** ज्येष्ठ रंगकर्मी धनाजी काळू मुंबईकर (वय ८१) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहित पुत्र, तीन विवाहित कन्या, सुना, जावई व नातवंडे असा आप्त परिवार आहे. चिरनेरच्या श्री गणेश नाट्य मंडळाचे पदाधिकारी असलेल्या धनाजी मुंबईकर यांनी सत्तरहून अधिक ऐतिहासिक व सामाजिक नाटकात अभिनय केला. चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शांताबाई साळवी



**माणगाव :** माणगाव येथील बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र.०६चे अध्यक्ष निलेश आनंद साळवी यांच्या मातोश्री शांताबाई आनंद साळवी यांचे वृद्धात्वाने वयाच्या ९५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, जावई, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने साळवी कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. कालकथित शांताबाई साळवी यांचा जलदान विधी व शोकसभा (उत्तरकार्य) १८ फेब्रुवारी रोजी साई नगर पुर्व, माणगांव येथे होणार असल्याचे त्यांचे सुपुत्र निलेश साळवी यांनी सांगितले.

## निवडक

### महिलेच्या पर्समधून मोबाईल लंपास

**पनवेल** : पायी चालत जात असलेल्या महिलेच्या पर्समधून १० हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शहरात घडली. पनवेल बस डेपोसमोरील रिक्षा स्टँडवरील रोडवरून विद्या थोरात या पायी जात असताना त्यांच्या पर्समधील १० हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अज्ञात कारणावरून एकाची आत्महत्या

**पनवेल** : अज्ञात कारणामुळे उंबराच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे.रामप्रकाश केवेट (२६) याने अज्ञात कारणावरून उंबराच्या झाडाला स्कार्फच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### रेल्वे नियंत्रण कक्षातून वस्तूंची चोरी

**पनवेल** : नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम आसूडगाव डेपो अंतर्गत पनवेल रेल्वे स्थानकात असलेल्या नियंत्रण कक्षामध्ये ठेवलेल्या कॉम्प्युटरसह इतर वस्तूंची चोरी झाल्याची घटना घडली. या कक्षाचे अज्ञात व्यक्तीने कुलूप तोडून आत प्रवेश करून पॉवर बॅकअप रुममध्ये ठेवलेला मॉनिटर, सीपीयु, माऊस, युपीएस बॅटरी बॅकअप आदी मिळून १३ हजार ६०० रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अवैधरित्या ट्रेलर उभे केल्याने कारवाई

**पनवेल** : धोकादायक पद्धतीने ट्रेलर उभे करून ठेवणाऱ्यांवर पोलिसांनी आता कारवाईचा बडगा उगारला आहे. महामार्गावरील पनवेल बाजूच्या एक्झिटवर धोकादायकरित्या ट्रेलर उभे करणाऱ्या दोघा जणांवर वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन इतर वाहनांचा अपघात होण्याची शक्यता होती. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी ट्रेलरचालक अली हुसेन शेख व पांडुरंग मिसाळ या दोन चालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अपघातात अज्ञात महिलेचा मृत्यू

**पनवेल** : वाहनाने धडक दिल्याने महिलेचा मृत्यू झाला असून याप्रकारणी खारघर पोलीस ठाण्यात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर स्कायवॉकच्या बसस्टॉपसमोरील रस्त्यावर मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर रविवारी (दि.११) एका अनोळखी ४५ वर्षीय महिलेचा मृतदेह आढळला. वाहनाने या महिलेला धडक देऊन तिचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती पोलिसांना न देता व महिलेला कोणतेही मदत न करता अपघात स्थळावरून पळून गेला आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# प्रदूषण नियंत्रणासाठी महामंडळाचा पुढाकार

## मोकळ्या भूखंडावर करणार वृक्षलागवड; रात्रीच्या वेळी प्रदूषणकारी कंपन्या बंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा औद्योगिक क्षेत्रात कारखान्यांमधून होणाऱ्या प्रदूषणामुळे नागरिकांना दररोज मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणासाठी महामंडळानेच आता पुढाकार घेतला आहे. याच अनुषंगाने रात्रीच्या वेळी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे, तसेच प्रदूषण करणाऱ्या कंपन्या पाच तास बंद ठेवण्यात येत असून औद्योगिक क्षेत्रात मोकळ्या भूखंडावर वृक्षलागवड करण्यात येणार आहे.



तळोजा औद्योगिक क्षेत्रात रात्रीच्या वेळी सोडण्यात येणाऱ्या केमिकलमुळे तळोजा, खारघर, रोडपाली, कळंबोली आणि जवळपास असलेल्या गावांना त्रास होत आहे. त्यामुळे विविध सामाजिक संस्थांनी प्रदूषणाविरोधात लोकायुक्तांकडे केलेल्या तक्रारीमुळे प्रदूषण महामंडळाने कंबर कसली आहे. याच अनुषंगाने प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी रात्रीच्या वेळी चार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक तैनात करण्यात आले आहे.

प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून कंपन्यांतील पाण्याचे नमुने तपासणी केली जात आहे, तसेच प्रदूषण करणाऱ्या कंपन्या रात्रीच्या वेळी पाच तास बंद ठेवणे तसेच काही कंपन्यांकडून प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास येताच तत्काळ नोटीस बजावणे, पर्यावरणाविषयी जनजागृतीसाठी कंपन्यांमध्ये बैठक घेणे, औद्योगिक क्षेत्रातील मोकळ्या भूखंडावर आंबा, फणस, कडुनिंब, चाफा या रोपांची लागवड करण्यात येणार आहे.

> **तळोजा औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी रात्रीच्या वेळी पथक तैनात करण्यात आले आहे. मोकळ्या भूखंडावर विविध प्रकारची झाडे लावण्यात येत आहेत. प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी कंपनी ओनर्स असोसिएशनसोबत बैठक घेण्यात येणार आहे.**
> **-विक्रांत भालेराव,**
> **क्षेत्रीय अधिकारी,**
> **प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
> **तळोजा**

## इंटरनॅशनल इंग्लिश ऑलिम्पियाडमध्ये 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशनतर्फे घेतल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंग्लिश ऑलपियाड परीक्षेला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी ११ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले.



या परीक्षेत इ. पाचवी दुर्वा देविदास पाटील, अनुका किशोर बोरसे, वेद कृपेश महाबळे, इ. सहावी शर्वरी नितीन जाधव, इ. सातवी आस्था अभिराज म्हात्रे, गायत्री नरेश बालशी, राशी राकेश पाटील, इ. आठवी शुभ्रा निशाकर झा, अनु गरिशकुमार मेनन, कानन विकास गुप्ता, इ. १० वी पुजा मिलींद नामे यांनी सुवर्णपदक पटकाविले. या स्पर्धेकरिता सर्व इंग्रजी विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली.

भविष्यातील स्पर्धा परिक्षांना यशस्वीरित्या समोरे जाण्यासाठी विद्यालयातील शिक्षक हे नेहमी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करीत असतात. त्यामुळेच अशा प्रकारचे यश प्राप्त होते, असे शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पनवेलमधून दोन दुचाकींची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातून दोन दुचाकींची चोरी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली.

संदीप भारुका यांनी त्यांची हिरो कंपनीची ॲक्टीव्हा मोरया गार्डन रेसिडेन्सी उसर्ली येथील पार्कींगमध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे, तर दुसऱ्या घटनेत दुर्गाप्रसाद पद्दीनटोलो यांनी त्याची दुचाकी ही कळंबोली सेक्टर ५ परिसरातील मैदानाजवळ उभी करून ठेवली असता, अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा

**उरण : वार्ताहर**

माघी गणेशोत्सवाचे औचित्य साधून शहरातील गणपती चौक येथील गणपती मंदिरात दर्शानासाठी भक्तांनी गर्दी केली होती. आमदार महेश बालदी यांनी रांगेत उभे राहून गणेशाचे दर्शन घेतले. मंदिराचे विश्वस्तांनी आमदार महेश बालदी यांचे स्वागत केले.

मोरा येथील ३०० वर्षांपूर्वीचे स्वयंभू गणपती मंदिरातही सकाळपासूनच भक्तांनी दर्शानासाठी गर्दी केली होती.

केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक मंदिर, कोटगाव, बालई, बोकडवीरा, सोनारी, भोवरा, मांगिर देव येथील गणपती मंदिरात गणेशजयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. या कार्यक्रमांचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला.





**पनवेल : वंदे मातरम् संघटनेच्या पनवेल ते कर्नाळा विभाग या मार्गाच्या नाक्याच्या बोर्डाचे अनावरण रायगड जिल्हा कामगार आघाडी अध्यक्ष कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या हस्ते झाले. आरटीओ मान्यताप्राप्त या नाक्याच्या उद्घाटनाला प्रमुख पाहुणे म्हणून महापालिका माजी नगरसेवक अजय बहिरा, कामगार नेते रवी नाईक, रवींद्र कोरडे, धर्मराज मच्छीगर, नाकाप्रमुख उमेश पाटील, नाका अध्यक्ष दिलीप गावंड, सभासद, प्रवासी उपस्थित होते.**

## ओबीसी संशोधन, धोरण समिती राज्य संयोजकपदी ॲड. मनोज भुजबळ



**पनवेल : प्रतिनिधी**

भाजपच्या ओबीसी विभागाच्या संशोधन आणि धोरण समितीचे राज्य संयोजक म्हणून पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक व महाराष्ट्र ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ॲड. मनोज भुजबळ हे महापालिकेचे माजी बांधकाम सभापती होते. पनवेल वकील संघटनेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. राज्यात भाजपच्या ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष म्हणून चांगले काम करीत असल्याने त्यांना ओबीसी समाजाच्या समस्यांची जाणीव आहे. त्यामुळेच त्यांची संशोधन आणि धोरण समितीचे राज्य संयोजक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्यासोबत सहसंयोजक म्हणून देवराव सोनटक्के, ॲड. वीना सोनवलकर, सदस्य संतोष वर्मा व हिरमान गावील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ॲड. मनोज भुजबळ यांच्या नियुक्तीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदर प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





**पनवेल : महानगरपालिका व रविशेठ पाटील सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने माघी गणेश जयंतीनिमित्त प्रभाग ७ रोडपाली विभाग येथे शून्य कचरा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी भाजप शहराध्यक्ष रविशेठ पाटील, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, गणेश उत्सव कमिटी सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.**

## गणेश जयंतीनिमित्त चिरनेरमध्ये महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

गणेश जयंतीनिमित्त हजारो भाविकांनी चिरनेर महागणपतीचे दर्शन घेतले. पहाटे ३ वाजल्यापासून श्रींच्या दर्शनाला प्रारंभ झाला. दर्शनासाठी अधिक वेळ लागत होता, मात्र तरीही गणेशभक्तांनी रांगेतच दर्शन घेणे पसंत केले.

नवसाला पावणारा आणि भक्तांच्या हाकेला धावणारे दैवत म्हणून चिरनेर महागणपतीची अनुभूती असल्याने प्रचिती येणारे भाविक आपल्या मनोकामना पूर्णतः वास नेण्यासाठी या चिरनेरच्या महागणपतीला नतमस्तक होण्यासाठी सालाबादप्रमाणे चिरनेर मुक्कामी दाखल होतांना पहावयास मिळत होते. त्यामुळे गणपती देवस्थाच्या विश्वस्त मंडळानी भक्तांना योग्यरितीने श्रींचे दर्शन घेता यावे यासाठी सर्व व्यवस्था सज्ज ठेवली होती.

भक्तगणांची गैरसोय होऊ नये, सर्वांना सुखकर सोयी सुविधा मिळून, रांगेत दर्शन घेता यावे, वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी चिरनेर गणपती देवस्थान प्रशासनाकडून चोख बंदोबस्त आणि आवश्यक सुसज्ज नियोजन करण्यात आले होते.



उरण तालुक्यासह पनवेल, पेण तालुक्यातील पायी दिंड्या दाखल झाल्या होत्या. कोरोना महामारी काळानंतर या गणेशोत्सवाचा पूर्वीचा जोश आता पूर्ववत झाल्याचे दिसत होते. चिरनेर परिसरातील तसेच अन्य ठिकाणाहून आलेल्या खेळणी, सौंदर्य प्रसाधने साहित्य, मिठाई तसेच अन्य व्यावसायिकांच्या धंद्याला उभारी मिळाल्याने यंदाचा माघी गणेशोत्सव अत्यंत आनंदात साजरा करण्यात आला.

## श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात बक्षीस वितरण सोहळा

**उरण : वार्ताहर**

स्व. श्री. जनार्दन भगत यांच्या जयंतीनिमित्त विविध स्तरावर घेतल्या गेलेल्या स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर येथे सोमवारी (दि.१२) उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या बोर्ड ऑफ मेंबर वर्षा प्रशांत ठाकूर उपस्थित होत्या, तसेच विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, कमिटी मेंबर सुनील पाटील, सुरेश पाटील, मुख्याध्यापिका अनुराधा काठे उपस्थित होत्या. विविध स्तरावर एकूण दहा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले गेले.

संस्थेच्या बोर्ड मेंबर वर्षा प्रशांत ठाकूर यांनी, विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेने अतिशय कल्पकतेने आयोजित केलेल्या स्पर्धांसाठी कौतुक करून विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना ट्रॉफी, रोख रक्कम व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. स्नेहल यांनी सर्वांचे आभार मानले.




## लेडीज स्पेशल ग्रुपचा हळदीकुंकू समारंभ उत्साहात



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील लेडीज स्पेशल ग्रुपच्या वतीने के. व्ही. कन्याशाळेत हळदीकुंकू समारंभ उत्साहात झाला. या समारंभात सुमारे ६० महिलांनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ग्रुपच्या संस्थापिका शशी देसाई यांच्या हस्ते समारंभाला सुरुवात करण्यात आली. आठ वर्षांपूर्वी या ग्रुपची स्थापना झाली असून ग्रुपमध्ये विविध क्षेत्रांतील महिलांचा समावेश आहे. प्रत्येक संकटाच्या वेळी ग्रुपमधील महिलांचा हिरीरिने सहभाग असतो. नृत्य, गायन, उखाण्यांमुळे समारंभास रंगत आली. वयाचे बंधन न ठेवता आपली आवड जोपासून आयुष्य स्वच्छंदी कसे जगावे याचा प्रत्यय या वेळी आला.

वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये जिंकलेल्या महिलांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. त्यामुळे त्यांचा आनंद द्विगुणीत झाला. आगामी काळात महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी तसेच गरजूंना मदत करण्यासाठी हा ग्रुप प्रयत्नशील असणार आहे.

## संपादकीय

# आंदोलनाचे टाइमिंग

पंजाब, हरयाणातील शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेऊन २०२१च्या नोव्हेंबरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने कृषीविषयक कायदे मागे घेतले होते. तसे करताना मोदी सरकारने कुठेही सत्तेचा अहंकार आड येऊ दिला नाही. त्यानंतर आता पुन्हा तेच शेतकरी हमीभावासाठी स्पष्ट कायदा करावा आणि स्वामिनाथन आयोगाच्या सर्व शिफारशी मंजूर कराव्यात या मागणीसाठी अडून बसले आहेत. त्याचबरोबर शेतकरी अथवा शेतमजुराला निवृत्तीवेतन लागू करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुका उंबरठ्यावर आल्यानंतर या शेतकऱ्यांना अचानक आंदोलने कशी आठवतात याचे उत्तर मात्र अद्याप सापडलेले नाही.

**नारी शक्ती, युवा शक्ती यांच्याबरोबर कृषी शक्तीचे संवर्धन करण्याचा संकल्प मोदी सरकारने केला आहे, किंबहुना गेल्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीसमोर हे तीन घटक नेहमीच होते आणि भविष्यातही असतील. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी मोदी सरकार सुरुवातीपासूनच प्रयत्नशील राहिले आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी ज्यांनी आपले संपूर्ण जीवन वेचले, त्या एम.एस. स्वामिनाथन यांना भारतरत्न जाहीर करून सन्मानित केले ते मोदी सरकारनेच, हे लक्षात घेतले पाहिजे. स्वामिनाथन आयोगाने कृषी विकासाच्या दृष्टीने अनेक शिफारसी केल्या. स्वामिनाथन आयोग ही भारतीय लोकशाहीला मिळालेली एक देणगीच म्हटली पाहिजे. भारत हा कृषीप्रधान देश आहे तसेच भारताचे भविष्य कृषी विकासाच्या मार्गानेच उज्ज्वल होऊ शकते यासाठी शेतकऱ्यांचे हात बळकट करण्याला प्राधान्य दिले पाहिजे असा सिद्धांत स्वामिनाथन यांनी मांडला. त्यासाठी त्यांनी अहोरात्र संशोधन केले. स्वामिनाथन आयोगाने केंद्र सरकारला अनेक शिफारसी केल्या. काळ्या मातीमध्ये खपणाऱ्या शेतकऱ्यांसाठी स्वामिनाथन देवदूतासमान होते. शेतकऱ्यांना हमीभाव देण्याचा विचार स्वामिनाथन यांनीच दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचीच विचारसरणी अनुसरून देशातील शेतकऱ्यांसाठी अनेकविध निर्णय घेतले. शेतकऱ्यांच्या हमी भावाच्या मागणीला फार मोठा इतिहास आहे. महाराष्ट्रामध्येही याच मागणीसाठी ८०च्या दशकात शेतकरी संघटनेचे ऐतिहासिक आंदोलन झाले होते, मात्र त्यानंतर आलेल्या विविध पक्षांच्या सरकारांनी शेतकऱ्यांच्या मागणीकडे पूर्ण दुर्लक्ष केले. मोदी सरकारने शेतकऱ्यांच्या विकासासाठीच साडेतीन वर्षांपूर्वी तीन कृषीविषयक कायदे मंजूर केले होते, परंतु सरकारचे हे पाऊल आपल्याच हितासाठी आहे हे काही पंजाब, हरयाणातील शेतकऱ्यांना पटू शकले नाही. परिणामी तेथील शेतकऱ्यांनी तीन वर्षांपूर्वी उग्र आंदोलन करून जवळपास वर्षभर राजधानी दिल्लीला वेढा घातला होता. शेतकऱ्यांच्या विकासासाठीच केंद्र सरकार तसेच अन्य राज्य सरकारे धडपडत असतात हे कुणीही नाकारणार नाही, कारण या शेतकरी वर्गामधूनच बव्हंशी राजकारणी पुढे येत असतात. मोदी सरकारने आजवर कधीही शेतकऱ्यांच्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता लावलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यांचे उग्र आंदोलन सुरू असतानादेखील चर्चेची दारे मोदी सरकारने आजही खुली ठेवलेली आहेत. प्रश्न आहे तो कायदा व सुव्यवस्थेचा. ती बिघडता कामा नये याचीही खबरदारी सरकारनेच घेणे अपेक्षित आहे. प्रकरण पंजाब उच्च न्यायालयातही पोहचले आहेच. लोकसभा निवडणुका उंबरठ्यावर आल्यानंतर उत्तरेतील शेतकऱ्यांना अचानक आंदोलने का आठवतात, त्यांच्या आंदोलनांचे टायमिंग कसे ठरवले जाते या प्रश्नांची उत्तरे मात्र अद्याप मिळालेली नाहीत. तथापि, शेतकऱ्यांची समजूत घालून शेतीविषयक प्रश्नांबाबत काही ठोस निर्णय केंद्र सरकारला निवडणुकीपूर्वीच घ्यावे लागतील हे नक्की.**

# आश्रय सोशल फाउंडेशनची अनोखी समाजसेवा









**खबरबात**
**नितीन देशमुख**

दिदी, मला यातून बाहेर काढ... ती दुर्दैवी, अनाथ १४-१५ वर्षाची मुलगी आर्त आवाजात सांगत होती. एका दक्षिण भारतीय रिक्षावाल्याच्या नवी मुंबईत बारमध्ये काम करणारी ही मुलगी एकटी असल्याचे लक्षात आले. तिला घराचे कोणी नाही पाहून त्याने तिच्याशी प्रेमाचे नाटक करून तिला आपल्या जाळ्यात ओढले. तिचा विश्वास संपादन करून तिला आपल्या खोलीत राहायला आणले. नंतर तो तिला कॉंट्रॅक्टवर पाठवून तिच्या पैशावर मजा करू लागला. मुलीवर अनेकवेळा सामूहिक अत्याचार होत होते. त्यामुळे तिने दिदी, मला यातून बाहेर काढ म्हणून मदत मागितली. मग एक दिवस ती घरातून पळून आली. दिदीने तिला आपल्या घरात लपवून ठेवले. रिक्षावाल्याला दिदीबद्दल शंका असल्याने त्याने दिदीचा पाठलागही केला. तिच्या घरावर पळत ठेवली. अखेर एका नातेवाईक महिलेबरोबर बुरखा घालून पहाटे तिला स्टेशनवर नेऊन दुसऱ्या शहरात नेले. आज ती तरुणी तिथे चांगली नोकरी करून आपले आयुष्य सुखाने जगत आहे. नेहमी फोन करून आजही आपली खुशाली कळवत असते. ही दिदी म्हणजेच आश्रय सोशल फाउंडेशनमध्ये पर्यवेक्षक असलेल्या मनीषा अहिवळे.

मनीषा अहिवळे या मूळच्या सातारा जिल्ह्यातील फलटणच्या. बारावीपर्यंतचे शिक्षण झाल्यावर लग्न झाल्याने मुंबईला आल्या. आपल्या संसाराला हातभार लावण्यासाठी छोटी-मोठी नोकरी करतानाच सामाजिक कार्याची आवड होती. सन २००४मध्ये एका मैत्रिणीमुळे नवी मुंबईतील अलर्ट इंडिया या सामाजिक संस्थेमध्ये कामाला लागल्या. सन २०१२पासून अशोक गायकवाड आणि विमल गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमधील लोकपरिषद आणि आता आश्रय सोशल फाउंडेशनमध्ये काम करीत आहेत.

नवी मुंबई आणि पनवेलमध्ये बारबाला आणि सेक्स वर्कर महिलांची संख्या ४५०० हजारपेक्षा जास्त आहे. नेरूळमध्ये सेक्स वर्कर महिलांची मोठ्या प्रमाणात वस्ती आहे. या महिला अत्यंत गरीब परिस्थितील आहेत. त्यांच्याकडे औषधालाही पैसे नाहीत. पोटाची खळगी भरण्यासाठी व गावाला पैसे पाठवण्यासाठी या रस्त्यावर उन्हात उभ्या असतात. त्यांना आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतःची तपासणी करण्यासाठीही वेळ देता येत नाही. अशा निराधार महिलांसाठी नवी मुंबई आणि पनवेलमध्ये दिदी काम करीत आहेत.

नवी मुंबईत या महिलांमध्ये एड्स जागृतीचे काम करताना मुलींचे समुपदेशन करून त्यांना निरोध वापरण्याचे फायदे याची माहिती त्यांना मनीषादिदी देतात. मनीषादिदींनी स्वतः रस्त्यावर उभे राहूनही अनेकवेळा माहिती दिली. त्या वेळी अनेक पुरुषांनीही त्यांना शंका विचारल्या. त्यांनीही न लाजता त्यांच्या प्रश्नांना उत्तर दिली आहेत. या मुलींना क्षयरोग व एचआयव्ही तपासणी करण्यासाठी तयार करणे मोठे जिकरीचे असते. बारमधल्या मुलींना बारवाल्यांच्या परवानगीने त्याच्या धंद्यावर परिणाम होणार नाही अशी वेळ पाहून बारमध्येच डॉक्टर व लॅबवाल्याला बोलावून रक्त तपासणी करावी लागते. रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यास त्या मुलीवर रुग्णालयात उपचार करावे लागतात. त्यांची परिस्थिति पाहून त्यांच्यासाठी आपण काही तरी केले पाहिजे ही भावना मनीषादिदी यांच्या मनात सतत जागृत होत गेली, पण या महिलांना रस्त्यावर तपासण्यासाठी आडोसाही मिळणे शक्य होत नाही. त्यांच्यावर उपचार करता यावे यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यासाठीच त्या म्हणतात, अहो, कोणी रुग्णवाहिका देता का हो रुग्णवाहिका.

मनीषादिदी रोज १० ते १२ तास काम करतात. दररोज बारमध्ये व वस्तीत जाऊन काम करतात. त्यांचे काम सोपे नाही. त्यांना बारमध्ये जाताना पाहून अनेक जणांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. अनेकवेळा रिक्षाचालकही वेगळी वागणूक देतात, पण घरच्यांचा भक्कम पाठिंबा व विश्वास यामुळे १४ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा भावनेने काम करीत आहेत. त्यांना बारमधील मुलींना भेटण्यासाठी बारमालकांची मिनतवारी करावी लागते. शासन वेळेवर अनुदान देत नसल्याने अनेक वेळा तीन-तीन महिने पगारही मिळत नाही. पगार नाही तरीही त्या झपाटल्यासारख्या काम करीत आहेत. रस्त्यावर उभी राहणारी महिला असो किंवा बारबाला कोणतीही अडचण आल्यास रात्रीही दिदीला फोन करून सांगणार.

उत्तर प्रदेशातील एका १०-१२ वर्षाच्या मुलीला आई-वडील गेल्यावर तिच्या मामानेच रात्रभर स्वतः उपभोग घेऊन देहाविक्रीसाठी पुण्याला विकले होते. तिच्यावर होणाऱ्या सामुहिक अत्याचारामुळे तिला चालता अथवा बसताही येत नव्हते. तिची अवस्था पाहून तेथील एका मुलीने तिची भेट दिदीशी घालून दिली. तिची तपासणी करताना दिदीलाच रडू आले. तिला एड्सची लागण झाली होती. तिला तिथून सोडवून एका पॉझिटिव्हबरोबर तिचे लग्न लावून दिले, आज तिचा संसार सुरू आहे.

दुर्दैवी, अनाथ, शापित, रस्त्यावर तोंडाला रंग लावून उन्हातान्हात उभ्या राहणाऱ्या, पोटाची खळगी भरण्यासाठी रात्री जागवणाऱ्या अबलांच्या उद्धारासाठी अनेक सामाजिक संस्था काम करीत असतात. अशाच संस्थांच्या माध्यमातून चौदा वर्षे काम करणाऱ्या मनीषा अहिवळे यांचे वेगळेपण दिसून येते. या अनाथ पण दिशा चुकलेल्या मुलींना रस्ता दाखवण्याबरोबरच त्यांना त्यांच्या आरोग्याबाबत जागृत करण्याचे काम मेळावे घेऊन, माहिती देऊन आणि पथनाट्यासारख्या उपक्रमाद्वारे मार्गदर्शन चौदा वर्षे मनीषादीदी करीत आहेत. त्यांच्यामुळे अनेक मुलींचे आयुष्य बदलून गेलेले आपल्याला पहायला मिळते.

## बदलते तंत्रज्ञान

# 'व्हॅलेंटाईन डे'निमित्त सेल! 'या' वस्तू देऊ शकता गिफ्ट

ॲपल ही एक टेक कंपनी आहे. तसेच ही कंपनी आयफोन, मॅकबुक, स्मार्टवॉच आणि अन्य गोष्टींचे उत्पादन करते. तर आता ॲपल कंपनीने व्हॅलेंटाईन डे २०२४साठी सेलची घोषणा केली आहे. कंपनी नवीन ॲक्सेसरीज जसे की, रंगीबेरंगी आयफोन कव्हर, प्रोडक्ट्सवर खास ऑफर आणि ॲपल वॉचसाठी नवीन बँड सादर करत आहेत. व्हॅलेंटाईन डे निमित्त तुमच्या प्रियजनांना भेटवस्तू द्यायची असेल तर ॲपल डिव्हाइससाठी क्सेसरीज खरेदी करण्याची ही उत्तम वेळ ठरेल.



कोणते प्रोडक्ट्स या सेलमध्ये उपलब्ध असणार आहेत ते पाहू तसेच लक्षात ठेवा की, या खास प्रोडक्ट्सची विक्री सध्या ॲपल स्टोअरवर आणि काही ऑनलाईनसुद्धा उपलब्ध असणार आहे.

१. एअरपॉड्स आणि पल पेन्सिलवर इमोजी किंवा अक्षर कोरून घेऊ शकता : जर तुम्ही नवीन एअरपॉड्स किंवा ॲपल पेन्सिल खरेदी करण्याचा विचार करीत असाल, तर या सेलमध्ये तुम्ही या उत्पादनांवर तुमच्या नावाचे पहिले अक्षर किंवा इमोजी कोरून घेऊ शकता. एअरपॉड्सपासून ते यूएसबी-सीसह नवीन एअरपॉड्स प्रोपर्यंत ॲपल स्टोअरवर खरेदी केलेल्या एअरपॉड्सचे सर्व मॉडेल्सवर इमोजी किंवा अक्षरे विनामूल्य कोरून दिली जाऊ शकतात.

२. आयफोन १५, आयफोन १५ प्रोसाठी नवीन रंगाचे कव्हर : व्हॅलेंटाईन डे सेलचा एक भाग म्हणून ॲपल नवीन सीरिजच्या कव्हरसाठी रंग सादर करणार आहे, ज्यात आयफोन १५ प्रो मॅक्ससाठी नवीन हिरवा रंग, आयफोन १५ प्लससाठी ऑरेंज सॉर्बेट रंग, सिलिकॉन कव्हर आणि बेसलाइनसाठी फिकट गुलाबी रंगाचा समावेश असणार आहे. आयफोन १५च्या कव्हरसाठी सुरुवातीची किंमत या सेलमध्ये ४,९९० रुपये असणार आहे.

३. दहाव्या जनरल आयपॅडसाठी नवीन Folio कव्हर : तुमच्याकडे दहावा जनरल आयपॅड असल्यास तुम्ही आता अगदी नवीन कलिंगड फळाच्या रंगाचा Folio कव्हर खरेदी करू शकतात. या Folio केस कव्हरची किंमत ८,९०० रुपये आहे आणि हे पांढऱ्या आणि आकाशी रंगांमध्येदेखील उपलब्ध आहे.

४. घड्याळासाठी नवीन बँड : ॲपल वॉचसाठी ग्वाव्हा आणि बेज रंगाचे सोलो लूप बँड सादर करीत आहे (वॉच मालिका ९ साठी). हे बँड केवळ ॲपल स्टोअरवर विविध साईजमध्ये उपलब्ध असतील. या खास वस्तू तुम्ही सेलमध्ये खरेदी करू शकणार आहात.

# मराठी कवयित्री संजीवनी मराठे



**निमित्त**

विशेषकरून गीतरचना व सुस्वर काव्यगायन यांसाठी मान्यता पावलेल्या एक आधुनिक मराठी कवयित्री. संजीवनींचा जन्म पुण्याचा. शिक्षणही पुण्यातच झाले. महिला विद्यापीठाच्या जीए व एमए पदव्या त्यांनी संपादन केल्या. शाळकरी वयातच त्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. या रचनांचा काव्य-संजीवनी (१९३२) हा त्यांचा पहिला संग्रह असला तरी संजीवनींची रसिकांना खरी ओळख झाली ती राका (१९३८) या संग्रहातून (काव्य-संजीवनीतील निवडक रचनाही त्यात पुनर्मुद्रत केलेली आहे).

यानंतरची संजीवनींची कविता संसार (१९४३), छाया (१९४९), चित्रा (१९५७) व चंद्रफुल (१९५१) या कवितासंग्रहांतून प्रकाशित झाली आहे. भावपुष्प (१९५१) व परिमला (१९५९) हे त्यांचे गीतसंग्रह. संजीवनी (१९७६) हा त्यांच्या निवडक कवितेचा संपादित संग्रह तसेच काही बालगीतसंग्रह व लाडकी लेक (१९७६) ही अनुवादित बालकादंबरिका यांचाही त्यांच्या साहित्यसेवेत समावेश होते.

संजीवनींनी काव्यलेखनास प्रारंभ केला तो काळ तांबे व रविकिरण मंडळ यांच्या प्रभावाचा होता. साहजिकच तांबे यांच्या गीतशैलीची सार्वत्रिक मोहिनी आणि रविकिरणमंडळाने निर्माण केलेले काव्यगाय नास अनुकूल असे वातावरण यांच्या संस्कारांतून संजीवनींची कविता गेय रूपात अवतरली आणि त्यांच्या गोड गळ्याची तिला उत्तम जोड मिळाली. रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याची मोहिनीही त्यांत्यावर होती. तांबे यांची जीवनसृष्टी, सौंदर्यशक्ती तसेच शब्दकळा, आविष्काराचे वळण यांचा संजीवनींच्या कवितेवरील संस्कार स्पष्ट आहे, मात्र तांब्यांप्रमाणे त्यांची प्रतिभा नाट्यगीतानुकूल नाही तसेच मनोरमा रानडे यांच्या काव्यातून आधुनिक सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीमनाचा विशेषत: तिच्या प्रणयभावनेचा, जो एक सहजमोकळा आविष्कार घडण्यास प्रारंभ झाला होता, त्याची परंपराही संजीवनींच्या कवितेत पृथगात्य स्वरूपात प्रवाहित झालेली दिसते. प्रणयानुभवातील तरल स्पंदने, त्याची स्वप्निलता, अलौकिकता व्यक्त करणारी त्यांची कविता तिच्या अस्सलपणामुळे व वेगळेपणामुळे विशेष मनोवेधक ठरली. 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे' हे गीत याचे उत्कृष्ट प्रातिनिधिक उदाहरण होय.

स्वप्नाळू प्रणयिनीचे व संसारी गृहिणीचे भावविश्व चित्रित करणारी संजीवनींची कविता प्राधान्याने स्वत:तच केंद्रित झाली आहे. भाविश्वाचे भान विसरून स्वत:पलीकडच्या एखाद्या अनुभवाशी एकरूप झाल्याची 'एक सानशी कळशी' (छाया)सारखी उदाहरणे मोजकी आहेत. आत्मप्रतीतीच्या परिघाबाहेर गेली की, त्यांची कविता सांकेतिक व क्षीण होते, हे राष्ट्रप्रेमाचा आविष्कार करणाऱ्या त्यांच्या रचनेतून स्पष्ट होते.

संजीवनींच्या काव्यातून प्रीतीच्या पृथगात्म चित्रणाच्या बरोबरीने सौंदर्यपूजक वृत्ती, सश्रद्धता, वात्सल्यादी स्त्रीसुलभ भाव इत्यादींचा आविष्कारही आढळतो. त्यांचे अनुभवविश्व तसे साधे, व्याप व व्यामिश्रता या दृष्टीने मर्यादित असे असले तरी या कवयित्रीने आत्मप्रत्ययाशी व स्वत:च्या काव्यप्रकृतीशी प्रामाणिक राहून निर्मितीतील स्वत्व राखले आहे, हे महत्त्वाचे होय. त्यांच्या अनुभवविश्वाला असलेला निरागसतेचा रंग हे त्याचे एक वेधक वैशिष्ट्य आहे. संजीवनींच्या पुढील काळातील रचनेवर मराठी काव्यातील नवीन प्रवाह, स्थित्यंतरे यांचे बाह्यसंस्कार झालेले दिसतात. यातून अनुभवातील अंतर्मुखता तसेच रचनेतील साक्षेप व संयम वाढलेला दिसला तरी त्या कवितेचा गाभा तोच राहिला आहे. संजीवनींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख आवश्यक आहे. मुलांचे अनुभव प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊन देता अस्सलपणे साकार करण्याचे श्रेय त्यांनी मिळविणे आहे. महाराष्ट्र शासनाने बरं का गं आई (१९६२) व हसू बाई हसू (९१६३) या त्यांच्या संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला आहे.

**-सुधा जोशी, (साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : राजपुरी येथील एकच जंजिरा किल्ला पर्यटकांना पहावयास मिळतो. जवळच्या पद्मदुर्गावर जेट्टीची निर्मिती झाल्यावर पर्यटकांचा ओघ येथेसुद्धा वाढणार आहे.**

## आरोग्य प्रहर

# सफरचंद खाण्याचे फायदे, आजारांपासून राहाल लांब!

तुम्हाला जर आजारी पडायचे नसेल तर तुम्ही दररोज एक सफरचंद खाल्ले पाहिजे. सफरचंद खाण्याचा सल्ला डॉक्टरांकडूनदेखील दिला जातो. एक सफरचंद तुम्हाला अनेक आजारांपासून लांब ठेवतो. सफरचंद खाल्ल्याने आरोग्याच्या कोणत्या समस्यांपासून तुम्ही लांब राहू शकता चला जाणून घेऊयात...



रोज एक सफरचंद खा असं आपल्याला नेहमी सांगितलं जातं. आजकाल फॅशन म्हणा किंवा आणखी काय म्हणा सफरचंद सोलून खायचंसुद्धा फॅड आलंय. तुम्ही जर सफरचंद खात असाल, तर ते सोलू नका सालीसकट खा! अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर असे गुणधर्म सफरचंदाच्या सालीत असतात.

**वजन कमी करण्यात मदत**

रोज सफरचंद खाल्ल्याने पोटात भर राहते ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. सफरचंदमध्ये भरपूर प्रमाणात फायबर आढळते. यामध्ये पाण्याचे प्रमाणही अधिक असते. सफरचंद खाल्ल्याने जेवणावर नियंत्रण ठेवता येते. त्यामुळेच वजन कमी करण्यासाठी ही सफरचंद खाण्याचा सल्ला दिला जातो

**हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले**

फायबरने समृद्ध असलेला सफरचंद कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी देखील मदत करतो. यामुळे कोलेस्ट्रॉल कमी होऊन हृदयाचे आरोग्य सुधारते. सफरचंद खाल्ल्याने शरीरात कोलेस्ट्रॉल जमा होत नाही.

**पचन चांगले होते**

पोटाशी संबंधित समस्या असेल तर त्यांनी सफरचंद खालले पाहिजे. कारण यामध्ये भरपूर फायबर आढळते जे बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते. सफरचंदमधून शरीराला पेक्टिनचे प्रमाणही चांगले मिळते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढते**

सफरचंद खाल्ल्याने प्रतिकारशक्ती देखील वाढते. रोगप्रतिकारक शक्ती सुधारली तर तुम्ही अनेक आजारांपासून लांब राहू शकता. सफरचंद खाणारे व्यक्ती लवकर आजारी पडत नाहीत.

**यकृत डिटॉक्स करते**

शरीरात असलेले विषारी द्रव्ये यकृत काढण्याचं काम करते. यकृत डिटॉक्स करण्यासाठी सफरचंद खाऊ शकता.

**मधुमेह होण्याची शक्यता कमी**

तुम्ही जर दररोज एक सफरचंद खाल्ले तर तुम्हाला मधुमेह होण्याची शक्यतादेखील कमी होऊन जाते.

# खोपोली-खालापुरात गणेश जन्मोत्सव उत्साहात

## हजारो भाविकांनी घेतले वरदविनायकाचे दर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर-खोपोलीत माघी गणेश जन्मोत्सव मोठ्या भक्तीमय वातवरणात साजरा झाला. महड येथील अष्टविनायक क्षेत्र वरदविनायक मंदिरात, सावरोली गणेश मंदिर, खोपोलीत काटरंग येथील श्री सिद्धीविनायक मंदिर, शांतीनगर येथील श्री ओझा गणपती मंदिरात व आरडी नगर गणेश मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले.



महड श्री वरदविनायक मंदिरामध्ये काढलेली आकर्षक रांगोळी भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. मागील तीन दिवसांपासूनच जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवारी सकाळी कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते श्रींची महापुजा झाल्यानंतर दुपारी १२ वाजल्यापासून श्रींचा जन्म उत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या वेळी प्रख्यात कीर्तनकार चारुदत्त आफळे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

महड येथील वरदविनायक नवसाला पावतो, अशी ख्याती असल्याने भक्तांची मोठी गर्दी झाली होती. गणेश पाळण्याला नारळ लावून तो नारळ महिलांच्या ओटीत दिला जात होता. श्री गणपती संस्थान महडच्या कार्याध्यक्ष मोहिनी वैद्य, विश्वस्त मंदार जोशी यांच्यासह इतर विश्वस्त व व्यवस्थापक, पोलिसांकडून भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून जातीने लक्ष देले जात होते. जन्मोत्सवानंतर भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

त्याचप्रमाणे खोपोलीतील स्वयंभू काटरंग सिद्धीविनायक मंदिर, शांतीनगर येथील श्री ओझा गणेश मंदिर, आरडी नगर गणेश मंदिर येथेही माघी गणेश जन्मोत्सव सोहळा उत्साहात झाला.

# जांब्रुक वावंढळ येथे संगीत भजन स्पर्धा रंगली

**चौक : प्रतिनिधी**

वै. हभप मधुमाऊली यांच्या स्मरणार्थ मराठा समाजाने समाजस्तरीय भजन स्पर्धा कोयना जांब्रुक वावंढळ येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.



या स्पर्धेत महिला गट प्रथम वारकरी सांप्रदायिक भजन मंडळ करंजावडे भवानीनगर, द्वितीय विठ्ठलाई पद्मावती भजन मंडळ चिरंबे (अंबाडी), तृतीय वारकरी सांप्रदायिक भजन मंडळ कोयना जांब्रुक (वावंढळ), उत्तेजनार्थ विठ्ठलाई पद्मावती भजन मंडळ चिरंबे (अंबाडी), सर्वोत्कृष्ट गायिका आसावरी अरुण साळुंखे, सर्वोत्कृष्ट वादक शौर्य पवनराव कदम, सर्वोत्कृष्ट कोरस वारकरी सांप्रदायिक भजन मंडळ करंजावडे भवानीनगर तर पुरुष गट प्रथम केदारनाथ प्रासादिक भजन मंडळ कोयना वेळे, द्वितीय गावडाई झोलाई प्रासादिक भजन मंडळ उचाट (रानसई), तृतीय वैतरणा नगर भजन मंडळ अब्जे, उत्तेजनार्थ वारकरी सांप्रदायिक भजन मंडळ करंजावडे भवानीनगर, सर्वोत्कृष्ट गायक संजय साळुंखे, सर्वोत्कृष्ट वादक ओवेश कदम, सर्वोत्कृष्ट कोरस दत्त प्रासादिक भजन मंडळ महाळुंगे यांना गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला शिक्षण महर्षी यशवंत मोरे, ज्येष्ठ नेते यशवंतराव शिंदे, जगन्नाथ साळुंखे, प्रभाकर मोरे, प्रकाश साळुंखे, तुकाराम कदम, शिवाजी मोरे, पोलीस निरीक्षक सुरेश मोरे, माजी सैनिक विश्वास कदम, कृतिका कदम, श्रद्धा शिंदे, सदानंद कदम, दत्ताराम कदम, हभप रामचंद्र कदम, शिवरामराव कदम, राजाराम कदम, कॅप्टन विठ्ठल कदम आदी उपस्थित होते.

या वेळी भजन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले गणपत कदम (रोहिणे), चंद्रकांत मोरे (रवदी), अरूण साळुंखे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. ११ वर्षीय शौर्य कदम कार्यक्रमाचे आकर्षण ठरला. त्याचा विशेष सन्मान स्पर्धेचे परीक्षक भजन सम्राट रायगड भूषण भरतबुवा बेडेकर व मंगेशबुवा बेडेकर यांनी केला.

बक्षीस वितरणासाठी सरपंच सुहास कदम, सुरेश साळवी, माजी अध्यक्ष दिलीप कदम, हभप सुरेशराव कदम, शिवाजीराव मोरे, मकरंद कदम, शिवाजी साळुंखे, शुभम मोरे, रायगड अध्यक्ष सतीश कदम, भूषण कदम, सचिन कदम, अरूण कदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रायगड सचिव रोहित कदम, तर आभार ज्येष्ठ पत्रकार अर्जुन कदम यांनी मानले.

# म्हसळ्यात गणेश जन्मोत्सवनिमित्त धार्मिक कार्यक्रम



**म्हसळा :** दैवज्ञ समाज गणेश मंदिर ट्रस्ट म्हसळा यांच्या विद्यमाने म्हसळा येथील श्री गणेश मंदिरात सालाबादप्रमाणे माघी गणेश जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

पहाटे श्रींचा अभिषेक, पूजाविधी, दैवज्ञ समाज महिला मंडळ यांचे संगीत भजन, सिद्धीकला भजन मंडळाचे संगीत भजन, असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास दैवज्ञ समाज अध्यक्ष सुनील उमरोठकर, अनिल पोतदार, गौरव पोतदार, सौरव पोतदार, अशोक पोतदार, महेंद्र पोतदार, गौरी प्रसाद पोतदार, संपदा पोतदार, दादा पानसरे, महादेव कदम, रेखा धारिया आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांकडून कर्जतमध्ये पथनाट्याद्वारे जनजागृती

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ कर्जत अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल, कर्जत पोलीस ठाणे व समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलच्या सहकार्याने कर्जत शहरात प्रभातफेरी काढून शहरातील चौकाचौकात पथनाट्य सादर केले व जनजागृती केली.



कर्जत पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, मोटर वाहन निरीक्षक अजय कराळे, प्रा. संजय पाटील, प्रा. प्रवीण नेलपगारे, अनिल घरत, अर्चना दगडे, निलेश मराठे, अभिजीत मराठे आदी उपस्थित होते. सुरेंद्र गरड यांनी, रस्ता अपघात होण्याची मुख्य कारण व वाहतुकीचे नियम पाळणे किती महत्त्वाचे आहे, याविषयी विद्यार्थ्यांना संबोधित केले. अजय कराळे यांनी, वाहन चालवताना आपल्या छोट्याशा चुकीमुळे आपल्याबरोबरच समोरच्या वाहन चालकांचेही नुकसान होते. प्रसंगी प्राणावर बेतते. वाहनांचा अतिवापर केल्यामुळे अपघात व प्रदूषण होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे वाहन कायम सुस्थितीत असावे. याची काळजी घेणे गरजेचे आहे, असे स्पष्ट केले.

# मुरूड नगर परिषद शाळांचा बालमहोत्सव

**मुरूड : प्रतिनिधी**

सध्या काही पालकांना असे वाटते की आपला मुलगा-मुलीने इंग्रजी उत्तम बोलणे व छाप पाडता आली पाहिजे. त्याकरिता काही पालक मराठी शाळेत न पाठवता इंग्रजी शाळेत आपल्या मुलास पाठवतात, परंतु मराठी शाळेतूनही शिकलेले विद्यार्थी पुढे जाऊन चांगले इंग्रजी बोलू शकतात. त्यामुळे पालकांनी ही मानसिकता बदलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील यांनी केले.



नगर परिषद शिक्षण विभागाच्या वतीने मराठी शाळा क्र. ४मध्ये बालमहोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी त्या बोलत होत्या. महोत्सवाला शिक्षण मंडळाचे प्रशासकीय अधिकारी दिपाली दिवेकर, डॉ. मकबुल कोकाटे, संजय गुंजाळ, प्रमोद भायदे, पांडुरंग आरेकर, विजय सुर्वे, सिदेश लखमदे, पंकज बाईत, सीमा दांडेकर, युगा ठाकुर, उषा खोत, नैनिता कर्णिक, वैशाली कासार, अनघा चौलकर, सायली गुंजाळ, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

बालमहोत्सवाचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. खाद्यपदार्थ स्टॉलचे उद्घाटन माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मकबुल कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ व खेळण्याचे स्टॉल लावण्यात आले होते. डॉ. मकबूल कोकाटे, प्रमोद भायदे, संजय गुंजाळ, सीमा दांडेकर, दिपाली दिवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा चौलकर व आभार राजेश भोईर यांनी मानले.

# युसुफ मेहरअली सेंटर येथे शिक्षक व्यक्तिमत्व विकास शिबिर



**पेण : प्रतिनिधी**

ए. ई. एस. वनिता विद्यालय, ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन गिरगाव मुंबई यांच्या माध्यमातून साथी युसुफ मेहरअली सभागृह, तारा येथे शिक्षक व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते संदेश गायकवाड आणि पेण शाखा प्रधान सचिव जगदीश डंगर यांनी व्याख्यान दिले.

या वेळी त्यांनी बुवा, बाबा, मांत्रिक चमत्कार करून कसे फसवितात या संदर्भात चमत्काराची प्रात्यक्षिके करून उपस्थितांना दाखविली. शिबिराला विद्यालयाच्या प्राचार्य शिंदे मॅडम, अध्यापक बाबर सर, जगताप मॅडम, कुलकर्णी मॅडम, बागुल सर, अनघा सावंत आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# रोह्यात माघी गणेशोत्सव; दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात माघी गणेशोत्स उत्साहात साजरा करण्यात आले आहे.



गणेश मंदिरात सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी दिसून आली. गणेश मंदिरात विविध धार्मिक व भजनाचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील मेढा, सानेगाव, चणेरा, घोसाळे, धाटाव, धामणसई कोलाड, सुतारवाडी, खांब, नागोठणे विभागात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

## माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

गणपती बाप्पाच्या माघ महिन्यातील जयंती उत्सव मुरूड कुंभारवाड्यातील संतोष दर्ग यांच्या निवासस्थानी उत्साहात साजरा करण्यात आला. गणेश याग, गणेश जन्म सोहळा आणि त्यानंतर बाप्पाची मंगल आरती करण्यात आली. श्रीसिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी गणेशभक्ताची मोठी गर्दी केली होती.


## जाहीर सूचना

सर्व लोकांस जाहीर कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल नामे **श्री. रिजवान मुस्ताक पटेल, पत्ता- १४०४, गार्डन कोर्ट सोसायटी, प्लॉट नं २, सेक्टर ३५ ई, खारघर नवी मुंबई** या सोसायटींच्या उद्वाहक / लिफ्ट परवाना/ लाइसेन्स सदर कागदपत्र दि. १०/०२/२०२४ रोजी सायंकाळी ०७ वाजताच्या सुमारास झेरॉक्स काढण्याकरिता मोटरसाइकलवर जात असताना सदर लाइसेन्स/परवाना हा सेक्टर ३५ई खारघर, परिसर येथून गहाळ झालेला आहे, याची लेखी तक्रार खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे दिनांक १३/०२/२०२४ रोजी हरवलेल्या कागदपत्रांची पहिली खबर क्र. ०३५१/२०२४ नोंदवली आहे.

तरी तमाम जनतेस कळवण्यात येते की, सदर उद्वाहक/लिफ्ट परवाना/लाइसेन्स सदर कागदपत्र कोणास सापडले असल्यास पुढील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा ९०४९०३५४४५ अथवा सदर उद्वाहक/ लिफ्ट परवाना / लाइसेन्स आपल्यास आढळुन आले असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात खालील प्रमाणे दिलेल्या पत्त्यावर पाठवण्यात यावी.

दिनांक : १३/०२/२०२४
खारघर, नवी मुंबई.

**सही/-**
**ॲड. देवेंद्र भिका पाटील**

पत्ता-शॉप नं. १, श्रीजी सोहम, सी.एच.एस. लि., भुखंड कं. ७६, सेक्टर २१, उलवे, नवी मुंबई. ४१० २०६. मोबाईल नंबर ९०४९०३५४४५

## सार्वजनिक सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, बालाजी सृष्टी को. ऑप. हौ. सोसायटी लि. पनवेल, रायगड येथील सदनिका क्रमांक - १०१ च्या संबंधित परिशिष्ठ क्रमांक ४६ ते ५० असलेल्या ५ शेअर्ससाठी मूळ शेअर सर्टीफिकेट क्र. १ प्रमाणपत्र दि. 28.09.2002. S Ltd, Reg No NBOM /CID / MHG / (OH) 1314/JTR Dt 15.07.2002 प्लॉट क्रमांक ३, सेक्टर क्रमांक १९, एन पी एम रोड, न्यू पनवेल पिन ४१०२०६, श्री. जयंत गजानन दळवी यांनी हरवल्याची नोंद केली आहे.

पुसद अर्बन को. ऑप. बँक लिमिटेड, पुसद, यवतमाळ (ज्यांनी नोंदणीकृत करारानुसार फ्लॅट १०१ विकत घेतला आहे) सोसायटीकडे नवीन डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेटसाठी अर्ज केला आहे. तसेच बँकेने त्या फ्लॅटचे हस्तांतरण आणि सदस्यत्वासाठी अर्ज केला आहे. जर कोणत्याही व्यक्तीला / संस्थेला या समभागांवर आणि त्या फ्लॅटवर कोणत्याही स्वरूपाची कोणतीही हक्काची मागणी शुल्क किंवा धारणाधिकार प्राप्त झाला असेल, तर त्याची माहिती सोसायटीच्या सचिवाला १४ दिवसांच्या आत द्यावी.

ही सूचना प्रसिद्ध झाल्याची तारीख, त्यानंतर सोसायटीकडून कोणत्याही स्वरूपाचा कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही आणि पुसद अर्बन को. ऑप. बँक लिमिटेड, पुसद, यवतमाळ यांना डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट दिले जाईल आणि सोसायटी सदर बँकेच्या नावावर फ्लॅट क्रमांक १०१ हस्तांतरित करेल आणि बँकेला सोसायटीचे सदस्य म्हणून स्वीकार करेल.

तारीख : १३/०२/२०२४
ठिकाण; नवीन पनवेल

**सही/-**
सचिव
बालाजी सृष्टी को. ऑप. हौ. सोसायटी लि. पनवेल.


# रोह्यात विद्यार्थ्यांना दुर्बिणीद्वारे आकाश निरीक्षणाची पर्वणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याचे उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी शालेय विद्यार्थ्यांना दुर्बिण व मार्गदर्शनाद्वारे आकाश निरीक्षणाची पर्वणी उपलब्ध करून दिली. तळाघर येथील मध्यवर्ती ठिकाणी विभागातील असंख्य शालेय विद्यार्थ्यांना आकाशातील घटना व वस्तू याची सखोल माहिती देत चंद्र व गुरुचे दुर्बिणीद्वारे दर्शन घडवले.

राजिप शाळा तळाघर येथे सोमवारी (दि. १२) आकाशाची जोडू नाते विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सुधागड उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तंत्रज्ञ शरिफ फत्ते, बळीराजा फांऊडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, पत्रकार राजेंद्र जाधव, तलाठी सचिन काते, मंगेश मोरे, रुपेश शिंदे यांसह राजिप शाळा लांढर, वाशी, तळाघर, महादेववाडी, माध्यमिक शाळा तळाघर शाळांतील शिक्षक व ग्रामस्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## माणगांव नगरपंचायत, माणगांव

ता. माणगांव,जि.रायगड, पिनकोड ४०२१०४ Email - nagarapanchayatmangaon@gmail.com, फोन नं. ०२१४०-२६३०५६
जा.क्र./मानपं/जा.नि./१९२१/२०२३ २०२४ दिनांक १३/०२/२०२४

### जाहीर निविदा/फेरनिविदा सुचना

निम्ननिर्देशित कामाकरीता इच्छुक ठेकेदारांकडून दोन लखोटा पद्धीतीने सिलबंद निविदा खाली नमुद कालावधीपर्यंत मागविण्यात आले आहेत. कोरी निविदा मागणी अर्ज खाली नमुद कालावधीपर्यंत लेखी स्वरूपात माणगांव नगरपंचायत कार्यालयात कोरी निविदा पत्राची फी (ना परतावा) भरून मिळू शकतील.

| अ. क्र. | कामांचे नाव | कालावधी | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माणगांव नगरपंचायत कर्मचाऱ्यांना टी शर्ट पुरवठा करणे. (फेर निविदा क्र.२) | दि.१३/०२/२०२४ ते दि.२०/०२/२०२४ | २,०००/- | ५००/- |
| २ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माणगाव नगरपंचायत हददीतील सार्वजनिक शौचालयांना पीपीए व इतर साहित्य पुरवठा करणे | दि.१३/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ | ५,०००/- | ५००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माणगाव नगरपंचायत हददीतील भिंतीचित्रे रंगविणे तसेच अनुषंगिक कामे करणे. | दि.१३/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ | ५,०००/- | ५००/- |
| ४ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माणगाव नगरपंचायत हददीमध्ये पथनाटय, जनजागृती मोहीम व अनुषंगिक कामे करणे. | दि.१३/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ | ५,०००/- | ५००/- |
| ५ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माणगाव नगरपंचायत हददीमध्ये बाजारपेठ,व्यवसायिक क्षेत्रामध्ये Twin Bins बसविणे बाबत. | दि.१३/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ | ५,०००/- | ५००/- |
| ६ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये IEC अंतर्गत बॅनर छपाई करणे व अनुषंगिक कामे करणे. | दि.१३/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ | ५,०००/- | ५००/- |
| ७ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील उतेखोल आदर्श समता नगर येथील महिला व्यायामशाळा भाडेतत्वावर देणे. | दि.१३/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ | २,०००/- | ५००/- |
| ८ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील पाणीपुरवठा, दिवाबत्ती विभाग, आरोग्य विभागाकडील नादुरुस्त साहित्य लिलाव करणे | दि.१३/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ | २,०००/- | ५००/- |
| ९ | माणगांव नगरपंचायतीच्या कार्यालयीन कामकाजाकरीता वाहन पुरवठा करणे | दि.१३/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ | ५,०००/- | ५००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

वरील कामांच्या निविदा बाबतची अटी, शर्ती व निविदा फॉर्म माणगांव नगरपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

**सही/-** **मुख्याधिकारी** माणगांव नगरपंचायत | **सही/-** **उपनगराध्यक्ष** माणगांव नगरपंचायत | **सही/-** **नगराध्यक्ष** माणगांव नगरपंचायत

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे पडवी, ता. महाड, जि. रायगड येथिल खालील वर्णनाच्या मिळकती या आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे मुळ मालकांकडून कायम स्वरूपात खूषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा-वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

**मिळकतींचे वर्णन**

| सर्वे/ भूमापन नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ४६/१५ | ०-४२-३० पैकी क्षेत्र ०-२०-०० | ०.०६ | सौ. अंबिका बाबुलाल जैन |
| ४७/३ | ३-६७-०० | १-०० | सौ. लता सुरेश कोळी |

महाड
ता. १४/०२/२०२४

**सही/-**
**ॲड. स्वप्निल प्रभाकर ढवण**
महाड - रायगड
मो.नं. ८९८३२२९१११


## निवडक

### देऊळवाडी येथे आज सरस्वती पूजा



**उरण** : बसंत पंचमी उत्सव मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही सरस्वती पूजा बुधवारी (दि. १४) देऊळवाडी विठ्ठल मंदिर येथे आयोजित करण्यात आली आहे. सकाळी १० वा. महाआरती, भजन होणार असून सायंकाळी कीर्तन व भजन, रात्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार महेश बालदी यांची उपस्थित लाभणार आहे, अशी माहिती महासचिव रंजन कुमार यांनी दिली.

### संतोष ठाकूर यांना पुरस्कार



**पनवेल** : रायगड प्रेस क्लबचे यंदाचे सन्मान जाहीर करण्यात आले असून ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आदिवासींच्या न्याय हक्कांसाठी लढणारे रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांना सामाजिक कार्यकर्ता सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सन्मान पुरस्कार रविवारी (दि. १८) श्रीवर्धन येथे होणाऱ्या रायगड प्रेस क्लबच्या वर्धापनदिनी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

### दुर्ग मावळा प्रतिष्ठानतर्फे शिवजयंती उत्सव

**उरण** : दुर्ग मावळा प्रतिष्ठानच्या वतीने द्रोणागिरी किल्ल्यावर शिवजन्मोत्सवाचे आयोजन १८ व १९ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. १८ फेब्रुवारी रोजी द्रोणागिरी गडाची सफाई आणि सजावट, दुपारी विमला तलाव येथे रक्तदान शिबिर, गडावरील कुंडातील पाणी घेऊन खाली उतरणे, महाराजांच्या मूर्तीचे अभ्यंगस्नान, मशाल फेरी आणि दिपोत्सव तर १९ फेब्रुवारी रोजी बाळ शिवाजी राजांचा पाळणा, शिवप्रतिमा पूजन, प्रतिमा मिरवणूक, शिवराज्याभिषेक, दुर्ग पूजन, पोवाडा, व्याख्यान आणि मान्यवरांचे स्वागत तसेच शिवभोजन असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

### उमेश चौधरी यांचे संगीत संमेलनात गायन

**पनवेल** : रायगडचे भूमिपुत्र उमेश चौधरी यांचे



पं. सदाशिव पवार संगीत स्मृती संमेलनात रविवारी (दि. १८) शास्त्रीय गायन होणार आहे. स्वर निषाद फाउंडेशनच्या वतीने सातारा येथील स्वरगुंफण संगीत विद्यालयात पश्चिम महाराष्ट्र संगीत संमेलन आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये रविवारी उमेश चौधरी यांचे गायन होणार आहे. त्यांना तबल्यावर पं. रूपक पवार, हार्मोनियमवर संगीता सुतार तसेच पं. बिशाद पवार व दिपाली लोहार यांची साथ संगत लाभणार आहे.

# ड्राय वेस्ट बँक उपक्रमातून स्वच्छतेचा संदेश

## नवी मुंबई मनपाचा १५ शाळांमध्ये उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

मुलांना लहान वयापासूनच स्वच्छतेची सवय लागावी व त्यांच्या मनात स्वचछता संकल्पनेची रुजवात व्हावी या दृष्टीने 'ड्राय वेस्ट बँक' हा अभिनव उपक्रम नवी मुंबई महानगरपालिकेच्या बेलापूर ते वाशी विभाग कार्यक्षेत्रातील १५ शाळांमध्ये राबविला जात आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कचरा निर्मितीच्याच ठिकाणी ओला व सुका असे वर्गीकरण करणे ही संकल्पना अंमलात आणली जात आहे.

ड्राय वेस्ट बँक उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध प्रकारचा सुका कचरा गोळा करण्याकरीता कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आलेले असून त्यांनी जमा केलेला प्लास्टिक बॉटल, चिप्स व चॉकलेट्सचे कव्हर,




काचेच्या बाटल्या असा सुका कचरा आठवड्यातून एकदा ठरविण्यात आलेल्या दिवशी शाळेत आणला जातो. या उपक्रमांत सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्ग शिक्षकामार्फत पासबूक वितरित करण्यात येते. विद्यार्थ्याने आणलेल्या सुक्या कचऱ्यानुसार त्यास पॉईंट्स दिले जातात. यामध्ये पेट बॉटलला दोन पॉईंट्स, चिप्स, चॉकलेटच्या १० कव्हरला एक पॉईंट, घरगुती प्लास्टिकला दोन पॉईंट्स, काचेच्या बॉटलला दोन पॉईट्स, ट्रेट्रा पॅक/टिनला दोन पॉईंट्स अशाप्रकारे आणलेल्या विविध वस्तूंना पॉईंट्स देऊन त्याची नोंद पासबुकमध्ये घेतली जाते.

प्रत्येक १००, २००, ५०० पॉईंट्स नंतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहानात्मक शैक्षणिक वस्तूंचे वाटप केले जाते. दोन हजारहून अधिक पॉईंट्स प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास 'वेस्ट वॉरिअर' प्रमाणपत्र दिले जाते. हे जमा झालेले प्लास्टिक नवी मुंबई पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून स्वतंत्रपणे उचलले जाऊन त्याचे तुर्भे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी स्वतंत्र संकलन केले जाते. सद्यस्थितीत 'ड्राय वेस्ट बँक' हा उपक्रम बेलापूर व वाशी विभागातील १५ शाळांमध्ये राबविला जात असून त्यामध्ये २७७१ विद्यार्थी सहभागी आहेत. त्यामध्ये सर्वोत्तम पॉईंट्स प्राप्त करणाऱ्या स्वच्छतेविषयी जागरुक विद्यार्थ्यांचा महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

एस. एस. हायस्कूल, सेक्टर ४४, सीवूड नेरूळ येथील विद्यार्थी शुभम पाल याने सर्वाधिक २५०० पॉईंट्स प्राप्त केले असून नमुंमपा शाळा क्रमांक २, दिवाळे गाव येथील विद्यार्थिनी एकता सुरेश कोळी हिने २०२५ पॉईंट्स व नमुंमपा शाळा, वाशीगाव येथील विदयार्थी वंश केशव शिंदे याने ७०० पॉईंट्स मिळविले. या तिन्ही विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

## पनवेलमध्ये पत्नीवर ॲसिड हल्ला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हैदराबादला न येणाऱ्या पत्नीवर ॲसिड हल्ला केल्याची घटना तालुक्यातील खैरणे गावात घडली. २० जानेवारीला तळोजा येथील खैरणे गावात ही घटना घडली असून याबाबतचा रितसर गुन्हा दोन दिवसांपूर्वी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे. ॲसिड फेकणारा २८ वर्षीय पती फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पश्चिम बंगाल येथील रमजान गाझी आणि अमिना खातून हे दाम्पत्य खैरणे गावातील प्लॉट नं. १७ रिझवान कंपनीशेजारी भाड्याने राहत होते. रमजान हा बांधकामात मोलमजुरी करायचा तर अमिना ही कंपनीत कंत्राटी कामाला जात असे. या दोघांनाही तीन मुले आहेत. मागील काही दिवसांपासून रमजानने पत्नी अमिनाकडे येथे राहण्याऐवजी

**आरोपी पती फरार**

हैद्राबादला जेथे बहीण राहते तिकडेच काम पाहू आणि तिकडेच राहण्याचा हट्ट केला. अमिनाचा हैद्राबादला जाण्यास विरोध होता. त्यामुळे काही दिवसांपासून या दोघांमध्ये किरकोळ वाद सुरू झाले. १९ जानेवारीला रात्री असेच भांडण झाले होते, मात्र पहाटे दोन वाजता अमिना व मुले झोपली असताना रमजान हा ॲसिड घेऊन घरी आला. मुले झोपली असताना अमिनाला उठवून त्याने तिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकून तिला जखमी केले.

अमिनाने अंगावर पांघरुण घेतल्याने ॲसिड फेकल्यानंतर तिच्या चेहऱ्यावर थोडेच उडाले. जखमी अवस्थेमधील अमिनाला शेजारच्यांनी मदत केली. सध्या तिच्यावर कोलकाता येथील एनसीएमसी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्या परिसरातील बनियापुकुर या स्थानिक पोलिसांनी संबंधित घटनेचा गुन्हा नोंदविल्यानंतर हा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्याकडे वर्ग केला.

याबाबतचा रितसर गुन्हा १० फेब्रुवारीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांनी नोंदविल्यानंतर सहाय्यक पोलीस निरिक्षक अर्चना कुदळे यांच्याकडे हे गंभीर प्रकरण सोपविले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक कुदळे यांनी फरार रमजानचा शोध सुरू करून अमिनाच्या अंगावर हल्ला झाला त्या वेळचे त्यांच्या घरातील कपडे या प्रकरणात जप्त केल्याचे सांगितले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून रमजानच्या शोधासाठी स्वतंत्र एक पथक नेमण्यात आले आहे.



**उरण : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी त्यांनी स्वराज्य सप्ताहानिमित्त विमला तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला सजावट करण्याच्या मागणीचे पत्र दिले.**



**मुंबई : विविध जिल्ह्यांतील अनेक संघटनांच्या नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मंगळवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी त्यांचे स्वागत केले. पक्षप्रवेश करणाऱ्यांमध्ये नाशिक जिल्ह्यातील रामकृष्ण आरोग्य संस्थानचे अध्यक्ष स्वामी श्रीकंठानंद यांचाही समावेश होता. या वेळी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल आदी उपस्थित होते.**

## नेरूळमध्ये अतिक्रमणावर पालिकेची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्रातील नेरूळ विभाग अंतर्गत सोमवारी (दि. १२) श्री बालाजी मंदिर उतार भागावरील उद्यान भूखंड यथे सेक्टर २२ येथे अनधिकृत झोपडपट्टी वाढत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने झोपडपट्टी हटाव मोहिमेचे आयोजन पोलीस बंदोबस्तात करण्यात आले होते.

मोहिमेंतर्गत उद्यान भूखंडावरील अनेक झोपड्या निष्कासित करण्यात आल्या आहेत. या मोहिमेकरिता १० मजूर, दोन पिकअप व्हॅन, एक जेसीबी, एक डंपर, वापरण्यात आले. ही कारवाई सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण विभाग, मुख्यालय, सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी नेरूळ, कनिष्ठ अभियंता (अतिक्रमण) यांचे समवेत व अतिक्रमण विभागातील अधिकारी, कर्मचारी, सुरक्षारक्षक, पोलीस यांच्यामार्फत करण्यात आली.

## खारघरमध्ये अंधश्रद्धा निर्मुलनावर व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने थोर शास्त्रज्ञ गॅलिलीओ व चार्ल्स डार्विन यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त खारघरच्या सेलिब्रेशन सोसायटीमधील डॉ. नरेंद्र दाभोळकर प्रशिक्षण केंद्रामध्ये माजी सेवानिवृत्त महसूल अधिकारी अरविंद सोनटक्के यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्य सरचिटणीस विजय परब उपस्थित होते. या वेळी बोलताना सोनटक्के यांनी गॅलिलीओ व चार्ल्स डार्विन यांनी केलेल्या मानवाच्या उत्क्रांती सिद्धांतांचे विश्लेषणात्मक स्पष्टीकरण दिले अतिशय अमूल्य असे योगदान या दोन्ही महान शास्त्रज्ञांनी मानवाच्या उत्क्रांती बद्दल दिले आहे. विज्ञान हे माणसाच्या जीवनाचे मूळ कारण आहे. त्याच्याशिवाय आपण जगू शकत नाही म्हणून प्रत्येक गोष्टीमधील विज्ञान आपण जाणून घेतले पाहिजे व त्याची चिकित्सा केली पाहिजे आणि समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन केले पाहिजे, असा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात सर्वच कार्यकर्त्यांनी चळवळीच्या गीताने करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत पुस्तक भेट देऊन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजू रोठे यांनी केले. सूत्रसंचालन नवी मुंबई जिल्हा प्रधान सचिव प्रा. अमोलकुमार वाघमारे यांनी केले कार्यक्रमाचे आभार बेलापूर शाखा कार्याध्यक्ष महेंद्र राऊत यांनी मानले.

कार्यक्रमास जिल्हा कार्याध्यक्ष अशोक निकम, गजानन जाधव, किरण वाळुंज, किरण जोशी, कुमार भिवघडे, सौ. बुधकर, सचिन बुधकर, पीएसआय निकम, सुनील सावंत, जाधव, जिने सर, भारती हे उपस्थित होते.











**पनवेल, उरण : माघी गणेशोत्सवानिमित्त भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी न्हावेखाडी, बेलपाडा, धुतूम, खारघर बेलपाडा, मुर्बी येथील गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, शत्रुघ्न काकडे आदी उपस्थित होते.**




**पनवेल : गव्हाण खालची आळी येथील मंगलमूर्ती मित्र मंडळातर्फे माघी गणेशोत्सवानिमित्त बसविण्यात आलेली गणेशमूर्ती.**

### कै. मिलिंद चवरकर स्मृतीचषक क्रिकेट स्पर्धा

# महाडच्या एसबीसी अकॅडमीला विजेतपद

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यील पोयनाड येथे झुंझार युवक मंडळ आयोजित कै. मिलिंद रवींद्र चवरकर स्मृतीचषक ज्युनियर वयोगटातील एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत एसबीसी क्रिकेट अकॅडमी महाड संघाने अंतिम सामन्यात फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाचा पराभव करून विजेतेपद पटकाविले.



नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजीला आलेल्या महाड संघाने ४० षटकांच्या समाप्तीनंतर पाच गडी गमावत २४६ धावांचा डोंगर उभा केला होता. सलामीवीर फलंदाज आरुष कोल्हेने चौफेर टोलेबाजी करीत स्पर्धेतील वैयक्तिक तिसरे शतक ठोकले. त्याने १३९ चेंडूंचा सामना करताना १७ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १३४ धावांची खेळी केली. संपूर्ण स्पर्धेत आरुषने तीन शतके व एक अर्धशतक ठोकत ५४९ धावा केल्या. दुसऱ्या बाजूने महाराष्ट्राच्या पंधरा वर्षांखालील मुलींच्या संघात स्थान मिळवलेल्या रोशनी पारधी हिने नाबाद ५१ धावा काढून संघाला मोलाचे योगदान दिले. फायटर्स माणगाव संघाकडून पार्थ म्हस्के याने दोन, तर निधीश मेहता, तनिष्क टेमकर, ऋग्वेद जाधव यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

प्रत्युत्तरात माणगाव संघाचा डाव ३६व्या षटकात १०५ धावसंख्येवर आटोपला. निल जाधव याने सर्वाधिक २२ धावा केल्या. महाड संघाकडून आरुष कोल्हे याने तीन, तर रोशनी पारधी, यश साळुंके, प्रचिती जाधव यांनी प्रत्येकी दोन फलंदाजांना तंबूत धाडले.

स्पर्धेत स्पोर्टी-गो कळंबोली आणि भेंडखळ उरण संघांनी तृतीय, तर प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल व किक-फ्लिक क्रिकेट एरिना खोपोली संघांनी चतुर्थ क्रमांक मिळविला. सर्व विजेत्या संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

संपूर्ण स्पर्धेत आपली चमक दाखवणाऱ्या आरुष कोल्हेला मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज अजय जाधव, उत्कृष्ट गोलंदाज पार्थ म्हस्के, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक श्रेयांश शेडगे व श्रेय पाटील, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक देवांश शिंदे, श्रेयांश शेडगे, स्पर्धेतील इमर्जिंग प्लेयर म्हणून ऋग्वेद जाधव, अमर बिके, अंतिम सामन्यातील सामनावीर आरूष कोल्हे, स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू निल जाधव यांना निवड करून गौरविले गेले.

पारितोषिक वितरण समारंभास पोयनाड ग्रामपंचायतीचे सदस्य सुनील पाटील, माजी सरपंच भूषण चवरकर, 'झुंझार'चे अध्यक्ष अन्वर बुराण, सचिव किशोर तावडे, सदस्य अजय टेमकर, सुजित साळवी, अजित चवरकर, डॉ. कोल्हे, अविनाश मेहता, ॲड. पंकज पंडित, पलाश चवरकर, महाडचे प्रशिक्षक आवेश चिचकर, माणगावचे प्रशिक्षक रोहित काळे, पंच संदीप जोशी, संकेश ढोले, आदेश नाईक यांच्यासह खेळाडू, पालक व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कबड्डी स्पर्धेत कडसुरे संघ विजेता

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात प्रथमच तालुकास्तरीय अजिंक्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन गावदेवी क्रीडा मंडळ तळाघर यांनी केले होते. अंतिम लढत चौंडेश्वरी कडसुरे व काळभैरव स्पोर्टस् उडवणे या दोन बलाढ्य संघांमध्ये चुरशीची पहायला मिळाली. या लढतीत चौंडेश्वरी कडसुरे संघाचा सुपरडुपर रेडर निखिल शिर्के याच्या जबरदस्त कामगिरीच्या जोरावर या संघाने सहज विजय संपादित करून प्रथम क्रमांक पटकावले.



रोहा तालुका कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने झालेल्या या स्पर्धेत तालुक्यातील ४८ संघांनी सहभाग नोंदवला होता. तृतीय क्रमांक नवतरुण सोनारसिद्ध धाटाव आणि चतुर्थ क्रमांक नवतरुण तळाघर या संघाने मिळविला. चारही विजेत्या संघांना आकर्षक चषक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट खेळाडू निखिल शिर्के (कडसुरे), उत्कृष्ट चढाईपटू मयुरेश कराळे (उडदवणे), उत्कृष्ट पकडपटू कल्पेश शेळके (धाटाव), पब्लिक हिरो म्हणून संतोष जाईलकर (तळाघर) यांची निवड करून सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेस भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, रायगड जिल्हा मजदूर फेडरेशनचे चेअरमन हेमंत ठाकूर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, विठ्ठल मोरे, रोठ सरपंच जनार्दन मोरे, शिवसेना तालुका उपाध्यक्ष संदेश मोरे, रोहा शेतकरी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अनंत मगर, शिवसेना रोठ बुद्रुक शाखा प्रमुख निलेश वारंगे, राष्ट्रीय पंच लक्ष्मण गावंड, पोलीस मित्र अध्यक्ष मुकेश भोकटे, माजी उपसरपंच संतोष माने, रूपेश शिंदे, कृष्णा चव्हाण, सचिन लिंबोरे, अनंता चव्हाण यांनी भेट दिली.

# नेरे संघ सरपंच चषकाचा मानकरी

### भाजप नेते संजय पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आई जगदंबा इलेव्हन संघ खानाव यांनी आयोजित केलेल्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत नेरे येथील जय हनुमान क्रिकेट संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक एमटीसीसी बोरखार, तृतीय साई स्टार विहिघर, चतुर्थ श्री गणेश मित ११ मोहो, पाचवा गावदेवी अजिवली, सहावा क्रमांक श्री गणेश वाजे संघाने प्राप्त केला. स्पर्धेत मालिकावीर सूर्यकांत म्हसकर (मोहो), उत्कृष्ट फलंदाज सनील फडके (विहीघर), उत्कृष्ट गोलंदाज शुभम डाकी (बोरखार), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक सचिन मोरे





(नेरे) यांची निवड करण्यात आली. विजेते संघ व वैयक्तिक चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास भाजप नेते संजय पाटील, सुनील पाटील, शशिकांत दिसले, माजी उपसरपंच एकनाथ फराड, बळीराम भोईर, गणेश तातरे, विजय मुंढे, विलास भोपी, दीपक तवले, विलास तवले, बबन जाधव, संतोष दिसले, प्रकाश तवले, पुंडलिक तवले, सचिन मुंढे, प्रवीण पाटील, ऋतिक तवले, रोहित काळोखे, हरिश्चंद्र वारदे, नवनाथ जाधव, गणू मुंढे, टिळक पाटील, दिलीप पाटील यांच्यासह क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडूंनी अथक परिश्रम घेतले.

## सिया फोफेरकरची राज्यस्तरीय आष्टेडू आखाडा स्पर्धेसाठी निवड

**उरण : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत नवी मुंबई येथे झालेल्या मुंबई विभागीय शालेय आष्टेडू आखाडा स्पर्धेत उरण तालुक्यातील चिरनेर येथील सिया निनाद फोफेरकर हिने शिवकला या प्रकारात सुवर्णपदक पटकाविले. या कामगिरीबद्दल तिची निवड भंडारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सिया फोफेरकर ही आरकेएफ (जेएनपीटी) शाळेमध्ये इयत्ता नववीत शिकत असून तिला रायगड जिल्हाध्यक्ष संतोष कवळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या स्पर्धेसाठी राजू कोळी, गोपाळ म्हात्रे, रोहित घरत, राकेश म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सियाचे अभिनंदन व कौतुक होत आहे.



## माजी क्रिकेटपटू दत्ताजीराव गायकवाड यांचे निधन

**वडोदरा : वृत्तसंस्था**

भारतातील सर्वांत वयोवृद्ध कसोटी क्रिकेटपटू दत्ताजीराव कृष्णराव गायकवाड यांचे मंगळवारी (दि.१३) गुजरातमधील वडोदरा येथील राहत्या घरी निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. गायकवाड यांच्या पश्चात त्यांचा मुलगा अंशुमन गायकवाड आहे. अंशुमन हे भारतीय क्रिकेट संघाचे माजी प्रशिक्षक आहेत.



दत्ताजीराव गायकवाड हे १९५७-५८मध्ये रणजी करंडक स्पर्धेत बडोदा क्रिकेट संघाचे कर्णधार होते. गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली बडोदा संघाने वडोदरा येथील मोतीबाग स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात सर्व्हिसेस संघाचा एक डाव आणि ५१ धावांनी पराभव केला होता.

गायकवाड हे भारताचे माजी क्रिकेट कर्णधार सी. एस नायडू यांचे विद्यार्थी होते. १९८४मध्ये बडोद्याच्या महाराजांनी युवा खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी नायडू यांची नियुक्ती केली होती. त्या वेळी गायकवाड १२ वर्षांचे होते आणि बडोद्यात भारताचे माजी कर्णधार सीके नायडू यांनी सुरू केलेल्या पहिल्या अंडर-१४ आणि १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत त्यांनी भाग घेतला होता.

नायडू यांच्याकडून लेग-स्पिन आणि गुगली गोलंदाजीचे डावपेच आत्मसात करणाऱ्या गायकवाड यांनी १९५२ ते १९६१दरम्यान ११ कसोटी सामने खेळले आणि १९४८मध्ये बॉम्बे युनिव्हर्सिटीकडून (एकत्रित प्रांताचा भाग म्हणून) रणजी पदार्पण केले. पॉली उमरीगर आणि जी रामचंद हे त्यांचे सहखेळाडू होते.

विजय हजारेंसारख्या दिग्गजांशी भागीदारी करणारे गायकवाड हे एमएस युनिव्हर्सिटीच्या क्रिकेट संघाची स्थापना झाल्यावर पहिले कर्णधार बनले होते. नंतर २०००पर्यंत बडोदा रणजी संघाचे प्रशिक्षकही राहिले. १९६०च्या उत्तरार्धात बडोदा क्रिकेट असोसिएशनमध्ये क्रिकेट प्रशासक जयवंत लेले यांच्यासह गायकवाड यांनी सहसचिव म्हणूनही काम केले होते.

### पुरुष प्रथम श्रेणी कबड्डी स्पर्धा

## गुड मॉर्निंग स्पोर्ट्स, यंग प्रभादेवी, शिवनेरी सेवा, सुनील स्पोर्ट्स संघ दुसऱ्या फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

गुड मॉर्निंग स्पोर्टस्, यंग प्रभादेवी क्रीडा, शिवनेरी सेवा, सुनील स्पोर्ट्स यांनी विजय नवनाथ क्रीडा मंडळाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या पुरुष प्रथम श्रेणी कबड्डी स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. सेनापती बापट मार्ग, लोअर परेल येथील फिनिक्स टॉवरशेजारील मैदानात ही स्पर्धा सुरू आहे.

दुसऱ्या दिवशी गुड मॉर्निंग स्पोर्ट्स्ने वीर संताजी क्रीडा मंडळाला ४२-२८ असे पराभूत केले. विश्रांतीपर्यंत २३-१५ अशी आघाडी घेणाऱ्या गुड मॉर्निंगने नंतरच्या खेळातही त्याच जोशाने खेळत विजय सोपा केला. अथर्व कदम, रूपेश पांचाळ गुड मॉर्निंगकडून, तर रिझवान, अनिकेत पिंपळे वीर संताजीकडून उत्तम खेळले.

यंग प्रभादेवीने चुरशीच्या लढतीत जय दत्तगुरुला ३०-२९ असे चकविले. यश पवार, संजय म्हात्रे यांनी सावध सुरुवात करीत यंग प्रभादेवीला पहिल्या सत्रात १७-११ अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्रात जय दत्तगुरुच्या ऋतिक नागले, शुभम शिंगाडे यांनी खेळ उंचावत सामन्यात चुरस आणली, पण शेवटच्या क्षणी त्यांना एका गुणाने हार मानावी लागली. शिवनेरीने पिंपळेश्वर क्रीडावर ४०-२० अशी लीलया मात केली. यश राक्षे, अजय गुरव यांच्या चढाई पकडीच्या खेळाला हे श्रेय जाते.

सुनील स्पोर्ट्स्ने पहिल्या डावातील १३-१६ अशा तीन गुणांच्या पिछाडीवरून न्यू परशुराम मंडळाचा प्रतिकार ४७-२३ असा मोडून काढला. दुसऱ्या सत्रात सुर सापडलेल्या रोहन जाधव, यश बागल यांनी चढाई पकडीचा तुफानी खेळ करीत सुनील स्पोर्ट्सला २४ गुणांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवून दिला. जय भारत क्रीडाने आदर्श क्रीडाला ४६-२० असे एकतर्फी पराभूत केले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com